महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

# पक्षिमित्र

■ वर्ष अकरावे ■ अंक २ रा ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ जानेवारी २०२१ ■ पाने -२४



## संपादक

**श्री. दिगंबर गाडगीळ**
३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक - ४२२००५
स्थिरभाष : (०२५३) २५७७९६८ चलभाष : ९८८१०७९७११

**सहाय्यक संपादक**

**श्री. अनिल माळी,** नाशिक, मो. ९८५०८१८६४४
Email: anilrmali@yahoo.co.in

**श्री. किरण मोरे,** अमरावती, मो. ९९२३९१००३४
Email: kiranmorey1983@gmail.com

### कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | **डॉ. जयंत वडतकर**, अमरावती<br>मो. ९८२२८७५७७३ |
| कार्याध्यक्ष | - | **डॉ. राजू कसंबे**, ठाणे<br>मो. ९००४९२४७३१ |
| संघटक | - | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे**, अहमदनगर<br>मो. ९८५०२९१३२४ |
| कार्यवाह | - | **प्रा. डॉ. गजानन वाघ**, अमरावती<br>मो. ९८२२२०४०७० |
| सहकार्यवाह | - | **श्री. शरद आपटे**, सांगली<br>मो. ९८९०३८४४०० |
| सहसंघटक | - | **श्री. अनिल माळी**, नाशिक<br>मो. ९८५०८१८६४४ |
| सदस्य | - | **प्रा. निनाद शाह**, सोलापूर<br>मो. ९४२२४५९९१५ |
| सदस्य | - | **श्री. किशोर गठडी**, औरंगाबाद<br>मो. ९४२२२०२६२८ |
| सदस्य | - | **श्री. रोहन भाटे**, कराड (सातारा)<br>मो. ९४२२००४८०० |
| सदस्य | - | **श्री. सचिन मेन**, पालघर<br>मो. ८४४६२४८८८४ |
| सदस्य | - | **श्री. अनिल महाजन**, वरणगाव-जळगाव<br>मो. ८८०६१९८०४० |

### सल्लागार मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. भाऊ काटदरे | (चिपळूण) | मो. ९४२३८३१७०० |
| श्री. दिगांबर गाडगीळ | (नाशिक) | मो. ९८८१०७९७११ |
| डॉ. दिलीप यार्दी | (औरंगाबाद) | मो. ९४२२७०४२२१ |
| डॉ. अनिल पिंपळापुरे | (नागपुर) | मो. ९८८१७१३४६६ |
| श्री. बापुसाहेब भोसले | (अहमदनगर) | मो.९८२२६३३१३३ |


## संपादकीय

# हसू आणि आसू




**दिगंबर गाडगीळ**
संपादक, महाराष्ट्र पक्षीमित्र अंक
dgadgil09@gmail.com


महाराष्ट्र पक्षीमित्रने दोन वर्षांपूर्वी ५ ते १२ नोव्हेंबर हा पक्षिसप्ताह घोषित करून तो महाराष्ट्रभर साजरा व्हावा, असे आवाहन केले होते. या वर्षीच्या सप्ताहापूर्वी महाराष्ट्र शासनाने तो अधिकृत करून शासकीय आवाहनही केले. परिणामी तो आपल्या सभासदांनी आणि शासकीय यंत्रणांनी उत्साहाने साजरा केला. त्याच्या बातम्या वृत्तपत्रातून आणि आपल्या सभासदांच्या माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचल्या; अजूनही पोचत आहेत. शासनाने आपल्या मागणीची दखल घेतली ही आनंदाची बाब.

कोरोनाचा जोर काहीसा कमी होत आहे, असे वाटत असतानाच त्याने पक्षिमित्र चळवळीला तीन जबरदस्त तडाखे दिले. उल्हास राणे, माधवराव गोगटे आणि डॉ. विनय ठकार यांना ओढून नेले. उल्हास राणे औरंगाबाद आणि मुंबई येथील पक्षीमित्र संमेलनाचे अध्यक्ष होते. माझ्या पक्षिनिरीक्षण छंदाच्या बाल्यावस्थेत त्यांनी माझी एक चूक सुधारून मला दिशा दिली होती. नांदूर मध्यमेश्वर येथे शिकारबंदी व्हावी या मागणीचा पाठपुरावा केला होता. माधवराव गोगटे, ठाणे येथील पक्षीमित्र संमेनलाचे अध्यक्ष होते. नाशिकच्या पक्षीमित्र मंडळाला त्यांनी खूप मदत केली होती. या दोघांबद्दलचे लेख या अंकात दिले आहेत.

डॉ. विनय ठकार हे नाशिकच्या पक्षीमित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष होते. १९८२ साली स्थापन झालेल्या या मंडळाने १९८६ मध्ये महाराष्ट्र पातळीवराचे पक्षीमित्र संमेलन श्री. चित्तमपल्ली यांच्या अध्यक्षतेखाली भव्य आणि अभिनव पद्धतीने साजरे केले होते. मी त्या संमेलनाचा निमंत्रक होतो.

हा अंक प्रसिद्ध करत असताना एका डोळ्यात आनंदाश्रू तर दुसऱ्या डोळ्यात दु:खाश्रू ओघळत आहेत.

*****

मुखपृष्ठ - Indian Silverbill Munia पांढऱ्या कंठाची मनोली छायाचित्र - श्री. किरण मोरे, अमरावती

# ⁕ अध्यक्षीय ⁕



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773

महाराष्ट्रात आजपासून सुमारे ४० वर्षांपूर्वी १९८१ साली महाराष्ट्र पक्षीमित्र या चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली. आज ही चळवळ चार दशकांच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचली आहे. त्याकाळी काही मोजक्या जेष्ठ पक्षिमित्रांनी लावलेले हे रोपटे आज एका मोठ्या वटवृक्षात रुपांतरीत होत असताना जसा आनंद त्यावेळी या चळवळीत कार्यरत असणाऱ्या ज्येष्ठांना होत असेल तोच आनंद अलीकडे नव्याने या चळवळीत जुडणाऱ्या पक्षिमित्रांनासुद्धा होत आहे यात शंकाच नाही. आजही पक्षिमित्रांचे संघटन असलेले महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असून, सातत्याने होणारी राज्यस्तरीय व विभागीय पक्षिमित्र संमेलने हे महाराष्ट्राचं खास वैशिष्ट्य बनलं आहे. या चळवळीतून आजवर अनेक पक्षी व वन्यजीव अभ्यासक, संशोधक, पर्यावरण संवर्धक, निसर्ग लेखक निर्माण झालेत. महाराष्ट्रभर विखुरलेले पक्षिमित्र, पक्षिनिरीक्षक, पक्षी अभ्यासक आणि पक्षितज्ज्ञ यांना एका व्यासपीठावर आणून पक्षी संवर्धनाविषयी चर्चा घडवून आणणे, यासाठी संमेलने हे हक्काचे व्यासपीठ झालेले आहे. पक्ष्यांचे संवर्धन व संरक्षणाचा ध्यास घेतलेली आणि आपआपल्या ठिकाणी कार्यरत राहून महाराष्ट्र पक्षीमित्राशी जुळलेले आपले आजीवन सभासद, तमाम पक्षिमित्र आणि अशासकीय संस्था हे महाराष्ट्र पक्षीमित्रचे जाळे, पाळेमुळे व पाठबळ. याच पाठबळाच्या सहकार्याने महाराष्ट्र पक्षीमित्रची वाटचाल सुरु आहे.

चाळीस वर्ष पूर्ण होण्याच्या निमित्ताने २०२१ हे वर्ष महाराष्ट्र पक्षीमित्रकडून चार दशकपूर्ती वर्ष म्हणून साजरे केले जाणार आहे. या निमित्ताने वर्षभर विविध उपक्रम साजरे करण्याचा मानस आहे. अर्थात यामध्ये आपण सर्वजण सहभागी होणार आहातच. या निमित्ताने पक्षी चळवळ आणखी विस्तारित करण्यासाठी आणि पक्षी संवर्धनासाठी दबाव गट तयार करण्यासाठी ही संधी साधून काय काय करता येऊ शकेल ? काही नाविन्यपूर्ण कल्पना सुचल्यास जरूर कळवाव्यात.

महाराष्ट्र पक्षीमित्रकडून गेली चार वर्षेसाजरा केला जाणारा पक्षी सप्ताह शासन स्तरावरूनसुद्धा साजरा केला जावा यासाठी महाराष्ट्र पक्षीमित्र व बहार नेचर फाउंडेशन, वर्धा या दोन्ही संस्थांच्या माध्यमातून वन विभाग तथा शासनाकडे सातत्याने पाठपुरावा व प्रयत्न केला जात होता. या आपल्या मागणीस दिनांक ०७ ऑगस्ट २०२० रोजी पार पडलेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीमध्ये मंजुरी मिळाली असून त्याची अधिसूचना दि. २६ ऑक्टोबर २०२० ला प्रसिद्ध झाली. त्यानुसार ५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर या दरम्यान संपूर्ण राज्यात यावर्षीचा पक्षी सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा केला गेला. यामध्ये शासनाचा वन विभाग, वन्यजीव विभाग आणि इतर विभाग मिळून प्रत्येक गाव, तालुका व जिल्हा पातळीवर तो साजरा केला गेला. अधिसूचना निघाल्यावर अवघे १० दिवस उरले असताना कार्यक्रमांचे नियोजन झाले आणि तो साजरा झाला. महाराष्ट्र पक्षीमित्रचे सर्व सभासद, संलग्नित संस्था यांचे नियोजन मात्र तयार असल्याने त्यांनी हा सप्ताह यावेळी आणखी उत्साहात साजरा केला. यावर्षी यामध्ये शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे यांनीसुद्धा आपला सहभाग नोंदविला ही आणखी जमेची बाजू. मात्र हा पक्षीसप्ताह साजरा केला जात असताना नुसता उत्सव साजरा होऊ नये, या निमिताने पक्षीसंवर्धन, अधिवास संवर्धन अशा विषयांना महत्त्व दिले जावे व प्रत्यक्ष कृतीसुद्धा व्हावी म्हणजे पक्षिसप्ताहाचे काहीतरी फलित होईल, एवढी रास्त अपेक्षा. पक्षिसप्ताह निमित्त महाराष्ट्र पक्षीमित्र आणि पक्षिमित्र चळवळ राज्यात सर्वदूर पोहोचली. इतकेच नव्हे तर या नाविन्यपूर्ण संकल्पनेची दखल, देशातील इतर राज्यातील पक्षिमित्रांनी व प्रसारमाध्यमांनी घेतली ही महत्त्वाची गोष्ट म्हणावी लागेल. राज्यातील अनेक आघाडीच्या वृत्तपत्रांनी पक्षी सप्ताह निमित्त संपूर्ण आठ दिवसांची लेखमाला किंवा बातम्यांची मालिका चालविली. समाजमाध्यमांवर सर्वत्र पक्षी सप्ताहाचा पूर ओसंडून वाहत होता. अनेक कार्यक्रमांच्या बातम्या येत होत्या. एकूणच संपूर्ण आठवडा उत्साहपूर्ण होता.

पक्षी सप्ताहाची अधिसूचना निघाली त्याच दिवशी म्हणजे २५ ऑक्टोबरला महाराष्ट्र पक्षीमित्रसाठी एक दुःखद घटना घडली. महाराष्ट्र पक्षीमित्रचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. उल्हास राणे सरांचे कोरोनामुळे बंगुलुरू येथे दुखद निधन झाले. या अनपेक्षित बातमीने संपूर्ण पक्षिमित्रांना धक्का बसला. उल्हास राणे हे बीएनएचएसमध्ये

संशोधक होते. शिवाय पक्षीमित्र सोबत कायम जुळलेले होते. ते दोन संमेलनांचे संमेलनाध्यक्ष राहिले होते आणि अजूनही संमेलनांमध्ये उपस्थित राहून नवीन पक्षीमित्रांसोबत संवाद साधण्यात त्यांना आनंद वाटत होता. मागील वर्षी जानेवारी २०२० मध्ये रेवदंडा येथे झालेल्या संमेलनातसुद्धा त्यांची उपस्थिती होती आणि पुढील सोलापूर येथे होऊ घातलेल्या ३४ व्या संमेलनातसुद्धा ते येणार असे त्यांनी मला आवर्जून सांगितले होते. सरांच्या जाण्याने पक्षिमित्र चळवळीतील ज्येष्ठ मार्गदर्शक हरवला आहे. महाराष्ट्र पक्षीमित्र त्यांना कायम स्मरणात ठेवील..

पक्षी सप्ताहास शासन मंजुरीच्या आनंदानंतर महाराष्ट्रासाठी आणि पक्षिमित्रांसाठी आणखी एक आनंददायी बातमी आली ती म्हणजे लोणार सरोवर रामसर स्थळ घोषित झाल्याची. लोणार सरोवराच्या रूपाने भारतातील ४१ वे तर महाराष्ट्रातील दुसरे रामसर स्थळ घोषित झाले. यापूर्वी याच वर्षाच्या सुरुवातीला २७ जानेवारी २०२० रोजी भारतातील १३ साईटसना रामसर दर्जा मिळाला होता, त्यावेळी महाराष्ट्रातील नांदूर मध्यमेश्वर हे पहिले रामसर स्थळ आपल्या राज्याला मिळाले होते. महाराष्ट्रातील या एकमेव स्थळाच्या नंतर अवघ्या ११ महिन्यानंतर लोणारच्या रूपाने राज्याला दुसरे रामसर स्थळ मिळाले. लोणार सरोवर हे अग्निजन्य खडकात उल्कापातातून निर्माण झालेले पाणस्थळ असून आकारमानाने जगातील तिसरे स्थळ हे त्याचे वैशिष्ट्य. त्यामुळेच ते रामसर घोषित होऊ शकले. भविष्यात राज्यातील रामसर घोषित करण्यासाठीचे आणखी काही प्रलंबित प्रस्ताव मार्गी लागतील अशी आशा आहे. रामसर स्थळ हा पक्षी संवर्धनातील एक महत्त्वाचा दुवा आहे.

अलीकडे पक्षीमित्रची दखल शासनापासून ते सर्वच स्तरांवरून घेतली जात आहे. तसेच आजीवन सभासद म्हणून अनेक लोक जुळत आहेत. मागील वर्षभरात ११५ पक्षिमित्र आजीवन सभासद म्हणून संस्थेसोबत जुळलेत ही आजवरची सर्वात मोठी संख्या आहे. नवीन लोकांसोबत आणि ज्येष्ठांच्या मार्गदर्शनात पक्षीमित्र आणखी जोमाने कार्यरत राहील असा प्रयत्न करू या...

आता हिवाळा जोमात आहे आणि पक्षी स्थलांतराचा काळ सुरू आहे. परिसरातील पाणस्थळी पुन्हा गजबजल्या असून लॉकडाऊन संपुष्टात आल्यानंतर पक्षिमित्र मोठ्या संख्येत पक्षी निरीक्षणासाठी बाहेर पडले आहेत. लॉकडाऊन संपले असले तरी कोरोनाचे संकट अजून टळलेले नाही. त्यामुळे आपणास योग्य ती काळजी घेऊन, सामाजिक अंतर पाळून या संकटावर मात करावी लागणार आहे. सुरक्षित रहा, सावध रहा! धन्यवाद!

*****



छायाचित्र- शशांक नगराळे,अमरावती

# पक्षी पर्यावरण आणि आपण




**हिरालाल रमेश चौधरी**
वनपरिक्षेत्र अधिकारी,
मेळघाट व्याघ्र प्रकल्प ढाकणा
(९५९५३९९५२९)


सध्या महाराष्ट्रात दिनांक ५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर पक्षी सप्ताह सुरू आहे. महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य जिथे अश्याप्रकारे पक्ष्यांच्या संरक्षण व संवर्धनाच्या हेतूने जनजागृती होण्याबाबत पक्षी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. आपण बघतो आहोत दिवसेंदिवस पर्यावरणाचा ढासळत चाललेला समतोल, वारेमाप जंगल कटाई, जंगलांवर होणारे अतिक्रमण, शिकार, अशाश्वत प्रकल्प, पर्यावरण बदल यांमुळे पक्ष्यांच्या विविध प्रजाती ह्या मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणावर लुप्त झाल्या आहेत आणि काही लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. पक्षी हा जीवसृष्टीचा अतिशय महत्त्वाचा घटक असून अन्नसाखळीतील महत्त्वाचा दुवा आहे. किडे खाऊन काही पक्षी आपला उदरनिर्वाह करतात म्हणून पक्ष्यांना शेतकऱ्याचा मित्र देखील म्हणता येईल. पक्ष्यांची कमी होणारी संख्या शेतातील विविध पिकांवर येणाऱ्या विविध रोगांना आणि त्यातील कीटकांच्या वाढीसाठी अनुकूल ठरत असल्याने शेतीचे उत्पन्न कमी होत आहे, त्यामुळे अन्नधान्य पुरवठ्या बाबत भविष्यात यक्षप्रश्न निर्माण होऊ शकतो. त्याचबरोबर बरेच पक्षी हे परागीभवन होण्याकरतादेखील महत्त्वाची भूमिका बजावतात. पक्ष्यांनी खाल्लेली फळे व फळांच्या बिया त्यांच्या विष्टेद्वारे जागोजागी विखुरतात. त्यामुळे नवीन झाडे उगवण्यास मदत होते. जीवसृष्टीत या नवनिर्माणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. परंतु अशाश्वत विकास, जंगल वणवे, शिकार, रासायनिक प्रदूषण, मानवाच्या बदलत्या जीवनशैलीतील विघातक बाबींमुळे पक्ष्यांच्या आधिवासाची साधने नष्ट होताना दिसत आहेत. या सर्व बदलणाऱ्या सभोवतालच्या बाबींशी जुळवून घेण्याच्या प्रक्रियेत पक्षी आपले घरटे बनवताना किंवा त्यांच्या खाण्याच्या सवयींमध्ये बदल करून घेत आहेत. त्यामुळे सहाजिकच नैसर्गिक जीवनचक्रात होणारा बदल यांच्यासह या सर्व पक्ष्यांसाठी मारक ठरताना दिसतो. कालचं उदाहरण आहे. मी दिवाळीच्या सुट्टी निमित्त माझ्या घरी स्व गावी आलेलो आहे. माझ्या घराच्या आजूबाजूला मी छोटीशी बाग तयार केली आहे. या बागेत विविध फळांच्या-फुलांच्या वेली, झाडे यांची लागवड केली आहे. यावर २५-३० प्रकारचे विविध पक्षी येतात, फळे खातात, फुलांचा रस शोषतात, पाण्याच्या कुंड्यांमध्ये पाणी पितात, झाडांवर- वेलींवर आपले घरटे बांधतात. असेच एक घरटे बागेतील चिकूच्या झाडावर पांढऱ्या कंठाची मनोली (Indian Silver bill) याने तयार केलेले मला दिसले. त्या घरट्यात नर व मादी हे आपल्या येणाऱ्या नव्या पिढीसाठी सुंदर खोपा तयार करत असतानाची लगबग मी बघत होतो. मऊ गादी तयार करण्याचे हेतूने या चिमणीने नवीन येणाऱ्या कुशिंगसाठी वापरण्यात येणारे कृत्रिम तंतू घरट्यात आणले. हे तंतू त्या मनोलीच्या पायात गुंतले त्यामुळे तिला उडता येत नव्हते. ती अडकून पडली; तिची तडफड पाहून मी अस्वस्थ झालो. मी त्वरित घरट्याजवळ जात त्या जंजाळातून तिला मुक्त केले आणि त्या तंतूंचा पुंजका काढून टाकला. मग ती आनंदाने उडत गेली आणि परत त्या घरट्यात येऊन बसली. हे एक उदाहरण झाले परंतु अशा अनेक टाकाऊ वस्तूंचा पक्ष्यांना आणि वन्यजीवांना धोका निर्माण झाला आहे.

आपण आपले आयुष्य सुखकर व्हावे म्हणून विविध वस्तू वापरून त्याची योग्य विल्हेवाट न लावता त्या फेकून देतो त्यामुळे अशा वस्तूंचे अतिशय घातक परिणाम या सर्व जीवसृष्टीवर होताना दिसत आहे. दरवर्षी पतंग उडवण्याचा काचयुक्त मांजामुळे हजारो पक्ष्यांनी आपला जीव गमवल्याचे किंवा अपंगत्व आल्याचे आपण टीव्हीवर पाहिले असेलच. हे खूपच धोकादायक असून सगळं पक्ष्यांच्या संरक्षण व संवर्धनाबाबत अडथळे निर्माण करणारे आहेत.

समाजामध्ये पक्ष्यांचे महत्त्व त्यांच्या संरक्षण व संवर्धनाबाबत जागृती व्हावी या उद्देशानेच वनविभाग, वन्यजीव संरक्षण व संवर्धना करिता काम करणाऱ्या सेवाभावी संस्था, पक्षिमित्र यांच्या अथक प्रयत्नातून पक्षी सप्ताहाच्या संकल्पनेला मूर्त रूप प्राप्त झाले आहे. या निमित्ताने मी आपणास सर्वांना विनंतीपूर्वक आवाहन करू इच्छितो की, आपल्या आजूबाजूला असणाऱ्या पशुपक्ष्यांबाबत आपण सूज्ञपणे विचार करावा व आपल्या कृतीतून किंवा आपण टाकून दिलेल्या वस्तूंमधून त्यांना धोका पोहोचणार नाही, याची काळजी घ्यावी. अन्यथा या सर्व पशु-पक्ष्यांच्या नाश झाला तर आपला देखील विनाश अटळ आहे.

*****

# पक्ष्यांचे डोळे


राजकमल जोब

भंडारा

मो.०९४०३०५८३४६

rajkamaljobyahoo.co.uk




काही पक्ष्यांचे डोळे हे अतिशय तीक्ष्ण असतात असे फार पूर्वीपासून माणसाला समजले होते आणि या माहितीचा उपयोग बाझ पक्ष्यांना पकडण्यासाठी शिकारी टोळ्या अनेक वर्षांपासून करीत होत्या. बाझ पक्ष्यांना पकडून त्यांच्याकडून ससे, लहान हरिण यांची शिकार करवून घेणाऱ्या जमाती मध्य-पूर्वेत अजूनही आहेत. या टोळ्या बाझ पक्ष्यांना पकडण्यासाठी ज्या लहान पक्ष्याचा उपयोग करतात तो पक्षी म्हणजे खाटिक (shrike) पक्षी.

बाझ पक्ष्यांना पकडण्यासाठी राखाडी खाटिक (Grey Shrike) पक्ष्यांना एका खास बनविलेल्या लहान झोपडीच्या दाराशी ठेवून झोपडीच्या बाहेर एक कबूतर बांधून ठेवले जाते. कबूतराला पकडण्यासाठी येणाऱ्या बाझ पक्ष्यांची सूचना राखाडी खाटिक पक्षी शिकाऱ्याला देतो.

माणसांचे डोळे पाहू शकणार नाहीत अशा अंतरावर असलेल्या बाझ पक्ष्याची सूचना खाटिक पक्षी देत असतो. या घटनेचे सुंदर वर्णन जेम्स. ई. हार्टिंग यानी १८७७ साली करुन ठेवले आहे. हे वर्णन नेदरलॅण्डमधील व्होल्कनस्वोर्ड या गावाजवळील आहे. ते लिहितात, 'आम्हाला एका लहान झोपडीत बसविण्यात आले. झोपडीच्या तोंडाशी एक जीवंत बाझ पक्षी बांधून ठेवलेला होता. हा पक्षी दुरुन येणाऱ्या बाझ पक्ष्याला येथे भक्ष्य आहे, हे सांगण्यासाठी' होता. झोपडीच्या जरा आत एक जीवंत कबूतर आमीष म्हणून बांधून ठेवलेले होते. झोपडीच्या बाहेर एक राखाडी खाटीक पक्षी बांधून ठेवलेला होता.

'आम्ही एका जवळच्या झोपडीत बसलो होतो. अचानक बाहेर बांधलेल्या खाटिक पक्ष्याने ओरडायला सुरुवात केली. त्याच्याकडे पाहिले असता तो घाबरलेला दिसत होता. काही वेळाने तो दबून बसला आणि एका दिशेकडे पाहू लागला. तो गवताच्या गंजीत लपण्याचा प्रयत्न करू लागला. बाझ पकडणाराने आम्हाला बाझ येत असल्याची सूचना दिली; पण कितीही प्रयत्न केला तरी आम्हाला बाझ पक्षी काही दिसत नव्हता. नंतर काही वेळाने आम्हाला व्होल्कनस्वोर्डच्या क्षितिजावर बाझ पक्ष्याचे दर्शन झाले.'

काही पक्ष्यांना इतक्या दूरचे कसे दिसते हे १८७२ साली शास्त्रज्ञांना त्यांच्या डोळ्यांच्या अंतर्गत भागांचा अभ्यास केल्यावर कळले. पाण्यात बुडी मारणारा खंड्या, शिकारी पक्षी : घार, गरुड, ससाणा यांसारख्या पक्ष्यांच्या डोळ्यात दोन दृष्टी मज्जापटल म्हणजे डोळ्याच्या मज्जापटलाची खळगी (fovea) असतात. ही मज्जापटलाची खळगी म्हणजे प्रकाशाची किरणे डोळ्याच्या समोरच्या भिंगावर पडून मागील पडद्यावर ज्या ठिकाणी पडतात ती जागा. डोळ्यांच्या आतील पडद्यावरील ही जागा जराशी खोलगट असते. या जागेवर पडणारी प्रतिमा स्वच्छ असावी म्हणून या जागेवर रक्तवाहिन्या नसतात. अशा दोन दृष्टी मज्जापटलाचे खळगे असलेल्या पक्ष्यांना दूरच्या वस्तू स्पष्ट दिसू शकतात तसेच त्या वस्तू किती अंतरावर आहेत याचाही अचूक अंदाज येतो.

मानवाच्या डोळ्यात असे एकच दृष्टी पटल असते असे शास्त्रज्ञांना १७९१ साली मानवी डोळ्यांच्या आतील रचनेचा अभ्यास केल्यावर समजले होते.केसी अलबर्ट वूड (१८५६-१९४२) या पक्षी शास्त्रज्ञाने आपल्या 'द फंड्स ऑक्युली ऑफ बर्ड्स' या १९१७ साली प्रसिध्द झालेल्या ग्रंथात काही पक्ष्यांच्या डोळ्यात दोन दृष्टिपटल असतात, असे लिहून ठेवले आहे. हा संपूर्ण ग्रंथ विविध पक्ष्यांच्या डोळ्याच्या आतील रचनेवरच लिहिलेला असा एकमेव ग्रंथ असावा. त्यात घार, ससाणा, शिक्रा या सारख्या शिकारी पक्ष्यांना दोन दृष्टी पटल असतात हे केसी वुड याने नमूद करुन ठेवले आहे. वुड लिहितात 'दोन दृष्टी पटल असलेल्या पक्ष्यांचे डोळे अतिशय तीक्ष्ण असतात'.

तसेही पक्ष्यांचे डोळे हे मानवांच्या डोळ्यांपेक्षा तीक्ष्ण असतात. म्हणूनच अठरा ते वीस मीटर अंतरावरील दोन सेंटीमीटर एवढा लहान कीटक वेडा राघू त्याच्या मागे उडत जाऊन पकडू शकतो. आपल्या पी.एच.डी.साठी 'गलीमॉट' (guillemot) या पक्ष्यांचा अभ्यास करताना 'टीम बर्कहेड' नावाच्या पक्षी शात्रज्ञ व लेखक याने असे लिहिले आहे की: तो स्कॉटलंड येथील स्कोमर बेटावर या पक्ष्यांच्या विणीच्या जागेवर बसलेला असताना तो ज्या गलीमॉट पक्ष्याच्या घरट्या जवळ होता त्या घरट्यातील मादीने अंड्यावरून उठून जोरजोरात ओरडायला सुरुवात केली. तिचे

ओरडणे हे नराच्या स्वागतासाठी असावे हे स्पष्ट समजत होते; पण ती ज्या दिशेकडे बघून ओरडत होती तिकडे दुर्बिणीतून पाहूनही काही दिसत नव्हते. असाच काही वेळ गेला आणि काही वेळातच हवेत गिरकी घेऊन नर घरट्याजवळ आला. यावरून काही पक्ष्यांच्या पहाण्याच्या क्षमतेचा अंदाज येतो.

पक्ष्यांच्या डोळ्याची स्तनधारी प्राण्यांच्या डोळ्यांशी तुलना केली तर असे लक्षात येते की, पक्ष्यांचे डोळे हे त्यांच्या शरीराच्या मानाने मोठे आहेत. बाहेरून वरकरणी ते मोठे दिसत नसले तरी त्यांचा मोठा भाग शरीराच्या रचनेत दबलेला असतो.

सर्वात लहान डोळे अर्थातच हमिंग बर्डचे असतात तर सर्वात मोठे डोळे शहामृगाचे असतात. शहामृगाचे डोळे मानवाच्या डोळ्यांच्या मानाने दुप्पट असतात. शहामृगाच्या डोळ्यांचा व्यास ५० मिलीमीटर असतो तर मानवाच्या डोळ्यांचा व्यास २४ मिलीमीटर असतो.

जे पक्षी दिनचर असतात आणि पहाटेस सूर्योदयाच्या पूर्वी जागे होऊन भक्ष्य शोधायला सुरुवात करतात आणि जे रात्री भक्ष्य शोधतात त्यांचे डोळे मोठे असतात.

डोळे हा खरोखरच सर्व पक्ष्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. त्यामुळेच त्यांना आपले अन्न मिळविता येते. असे असले तरी न्यूझीलंडमधील 'किवी' पक्ष्याचे डोळे हे इतके लहान आणि त्यांची दृष्टिक्षमता इतकी कमी का असावी हे कोडेच आहे.

*****



**लक्ष्मीकांत नेवे**
पक्षी अभ्यासक
भुसावळ

# काकथा

लहानपणी गोष्टी, सांगते तुमची आई.
घास देताना माझी, सारखी आठवण देई.

जन्मापासून मरणानंतरही, मी तुमचा सोबती,
काय चुकले माझे, पसरविता गैरसमजुती.

पंचतंत्र, जातककथा, इसापनिती आणि हितोपदेश.
अनेक गोष्टीत मी तुम्हाला, करीत असतो उपदेश.

कधी बांधिले मी, शेणाचे घर.
कधी ठरविली ऊंची,बघून पावसाची झड.

शाप देता सीतामाई,झालो म्हणे काळा.
फेकता काडी दर्भाची झालो म्हणे आंधळा.

डोळे शाबूत माझे दोन,तरी मी एकाक्ष.
श्राद्धपक्षाचा नायक मी,पिंडाकडे कटाक्ष.

असल्यातरी माझ्यावर,बहुचर्चित गमजा.
अभ्यासातून शास्त्र सांगते,धूर्त याला समजा.

आणले वर पाणी मी,माठात खडे टाकून.
खाल्ली टणक फळे मी,रस्त्यावर फेकून.

धूर्त मी हुशार मी,शास्त्र जरी सांगे.
पिले माझी वाढती,कोकिळेसंगे.

असा मी तसा मी,नका सांगू कथा.
लक्ष्मी म्हणे, वळवा साऱ्याच काक कथा.


–लक्ष्मीओळी
(लक्ष्मीकांत नेवे)

# पुस्तक परिचय

## मी पुन्हा नव्याने अनुभवलेला रानपिंगळा



**मनोज बिंड**
प्रसिध्द निसर्ग छायाचित्रकार
अमरावती
मो.९९२१८२४६९१




पुस्तकांची स्वतःची एक दुनिया असते. तीला फक्त एकाच बाजूने म्हणजे बाहेरून कडी असल्याने दार बंद असल्याचा समज होतो. कडी आपणहुन पुढाकार घेऊन काढावी आणि आत डोकवावे तर त्या विषयाच्या दुनियेची आगळी सफर घडुन येते.

मेळघाट, अमरावती, विदर्भ आणि पर्यायाने साऱ्या महाराष्ट्र राज्याचा मानबिंदू असलेल्या दुर्मिळ अश्या रानपिंगळा या पक्ष्याच्या भेटीचा योग पक्षीछायाचित्रणाच्या निमित्ताने मला बरेचदा आला. त्याचे बाह्यरूप आता परिचित झालेले असले तरी अंतरंगाची कुंडी उघडण्याचा योग मात्र डॉ.जयंत वडतकर, अमरावती लिखित रानपिंगळा–अज्ञातवास व पुनर्शोध या पुस्तकाच्या वाचनाच्या निमित्ताने आला.

घुबड या शब्दालाच भारतीय मनात एक गूढ वलय लाभले आहे, याबाबतची जाणीव वेगळ्या अर्थाने पुस्तकाच्या रानपिंगळयाचा पुर्वइतिहास या पहिल्याच प्रकरणाच्या निमित्ताने लेखक पक्की करतो आणि इथूनच वाचकाची उत्कंठा जागृत व्हायला सुरुवात होते. सन १८८४ नंतर पुढे तब्बल ११३ वर्षे कोणतीही नोंद न झालेला हा रानपिंगळा विलुप्त झाला की काय? या चिंता आणि काळजी नंतर सन १९९७ मध्ये हा रानपिंगळा अगदी चित्रपटाच्या नायकासारखा दमदार पुनरागमन करतो हा इतिहासाचा प्रवासच मुळात एखाद्या गूढ रम्य कथेपेक्षा कमी नाही.

या पुनर्शोधाकरीता अनेक नामवंत अभ्यासकांनी केलेले प्रयत्न आणि एकूणच हा इतिहास खऱ्या अर्थाने प्रेरणादायी तर आहेच पण आश्चर्यकारकरित्या रंजक सुद्धा आहे.

या पुनर्शोधाच्या वाटेवरील भारतातील तसेच विदेशातीलही अभ्यासक, संशोधकांच्या छायाचित्रांसह त्यांच्या कार्याबद्दलची टिपणे पुस्तकाची श्रीमंती वाढवतात. वेगवेगळ्या पिंगळ्यामधून रानपिंगळाची ओळख करतांना त्याची वेगळी वैशिष्ट्ये, त्याच्या अधिवासाची ठिकाणे, खाद्य सवयी ही माहिती समजण्यास सरळसोपी करुन मांडलेली आहेत. पक्ष्याचा आवाज किंवा साद यात फरक करणे, त्यातही त्या आवाजाचा अर्थ काय असू शकतो हे उमगणे कठीण काम आहे. मात्र पुस्तकात रानपिंगळ्याच्या विविध आवाजाचे अर्थासह वर्गीकरण जेव्हा लेखक मांडतो तेव्हा यामागील १९९८ पासूनचा २२ वर्षांचा कित्येक सहकाऱ्यांसोबत केलेला निरंतर आणि सखोल अभ्यास सहजच मनावर ठसतो. आपल्या या अभ्यासाकरिता आलेल्या अडचणी, साधनांची अनुपलब्धता, घेतलेले कष्ट याबाबतची वस्तुस्थिती व त्यानंतर लेखकाला आलेली श्रमसाफल्याची भावना या अनुभवाचे नकळत सहप्रवासी झाल्याची जाणीव वाचकांना होत जाते. मेळघाटातील स्थानिक वाटाडे आणि सहकारी यांच्या आत्मीयपूर्ण उल्लेखासह नऊ विविध प्रकरणांची मांडणी करतांना पक्षी अभ्यासाच्या विविध पद्धतीचा उहापोह पुनर्शोधानंतरचा अभ्यासफ या प्रकरणात होतो. यापुढे भारतातील विविध भागात रानपिंगळयाच्या अस्तित्वाबद्दल वाढत गेलेल्या नोंदीसोबत त्याच्या अधिवासाबद्दल धोक्यांची सूचक जाणीवही करून देण्यात येते.

अरण्यऋषी मारुती चितमपल्ली, बीएनएचएस चे माजी संचालक असद रहमानी तसेच प्रधान मुख्य वन संचालक नितीन काकोडकर या दिग्गजांच्या प्रस्तावना लाभलेल्या या पुस्तकात निनाद अभंग या मनस्वी कलावंताने रेखाटलेली रेखाचित्रे प्रसंगानुरूप वाचकाची साथ करतात. सोबतच त्यांनीच तयार केलेले रानपिंगळाच्या या गूढ रहस्यमयी अस्तित्वाला अधिवासाच्या पार्श्वभूमीसह योग्य न्याय देणारे मुखपृष्ठ प्रथमदर्शनी नजर खिळवून ठेवते. ज्याच्या अस्तित्वाबद्दलच शंका केली जाते, तरीही सतत चर्चेत राहण्याचे भाग्य किंबहुना स्टारडम लाभलेल्या फार मोजक्या उदाहरणापैकी रानपिंगळा हा एक पक्षी ही या पुस्तकाची थीम असेल तर शेवटपर्यंत वाचकांना त्यापासून तसूभरही ढळू न देण्यात लेखक आपल्या लेखनकौशल्याने पूर्ण यशस्वी झाले आहेत. एकाच पक्ष्याचा विविधांगी सखोल अभ्यास करून तयार केलेल्या शास्त्रशुद्ध आणि तेवढ्याच सुलभ माहितीचे हे पुस्तक म्हणजे छोटा तरीही परिपूर्ण प्रबंधच वाटतो याबद्दल कोणतेही दुमत असू नये. आणि असे असूनही केवळ अभ्यासात्मक टिपणे आणि निरीक्षणे यापलीकडेही जाऊन हे पुस्तक एखाद्या कादंबरीसारखे कथात्मक प्रवाही आहे.पक्षीमित्र, अभ्यासक, संशोधक आणि एकूणच निसर्गाची आवड असणाऱ्या प्रत्येक वाचकांच्या संग्रहात हवेच याकरिता आग्रही असावे असे हे पुस्तक.

*****

# पक्षी सप्ताहनिमित्त आयोजित राज्यस्तरीय पक्षी छायाचित्र स्पर्धेचा निकाल

नोव्हेंबर महिन्यात महाराष्ट्रभर साजरा झालेला पक्षिसप्ताह मोठ्या उत्साहात साजरा झाला. महाराष्ट्र पक्षीमित्रच्या पक्षी सप्ताहास शासन स्तरावरून मान्यता मिळाल्याने यावर्षी राज्यात मोठ्या प्रमाणात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अमरावती येथील वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था व महाराष्ट्र पक्षीमित्रच्या सहयोगाने दि. ५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर दरम्यान साजरा झालेल्या पक्षी सप्ताह निमित्त राज्यस्तरीय पक्षी छायाचित्र स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या छायाचित्र स्पर्धेचा विषय पक्षी छायाचित्रण असा होता. प्रवेशिका स्वीकारण्याचा कालावधी हा ५ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर या दरम्यान होता. या दरम्यान एकूण ६३ सहभागींनी सहभाग नोंदवून एकूण १६० प्रवेशिका स्पर्धेसाठी प्राप्त झाल्या होत्या. या स्पर्धेचा निकाल दि. ५ डिसेंबर रोजी जाहीर करण्यात आला. उत्कृष्ट तीन विजेत्यांची व दोन प्रोत्साहनपर प्रवेशिकांची परीक्षकांकडून निवड करण्यात आली. यामध्ये प्रथम पारितोषिक ठाणे येथील डॉ. सुधीर गायकवाड इनामदार यांच्या छायाचित्रास प्राप्त झाले. द्वितीय पारितोषिक शेवगाव, अहमदनगर येथील ज्ञानेश्वर कातकळे यांच्या छायाचित्रास प्राप्त झाले. तृतीय पारितोषिक नागपूर येथील कपिश राय यांच्या छायाचित्रास प्राप्त झाले. उत्तेजनार्थ पारितोषिकांमध्ये विनय बढे, अमरावती व आनंद बोरा, नाशिक यांच्या छायाचित्रांची निवड करण्यात आली. सहावे उत्कृष्ट छायाचित्र परीक्षकांकडून निवडण्यात आले असून हे विशेष पारितोषिक ठाणे येथील अविनाश भगत यांच्या छायाचित्रास प्राप्त झाले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून पुणे येथील प्रसिद्ध चित्रकार तथा पक्षितज्ज्ञ निनाद अभंग, तसेच विदर्भातील नामवंत पक्षी छायाचित्रकार मनोज बिंड, जय फोटो लॅबचे संचालक तथा पक्षी छायाचित्रकार वैभव दलाल, वन्यजीव छायाचित्रकार मनीष मुऱ्हेकर, वेक्सचे छायाचित्रकार अमित सोनटक्के यांनी जबाबदारी पार पाडली. या स्पर्धेचे संयोजक म्हणून वेक्सचे कार्यकारिणी सदस्य सौरभ जवंजाळ यांनी काम केले तर मोहित गावंडे व सुमित अंबुलकर यांनी सदर आयोजनात महत्वपूर्ण सहकार्य केले. स्पर्धेसाठी Calix Tatto स्टुडियोचे कपिल नागपूरकर, Wild Adventure चे गौरव कडू, महालक्ष्मी एंटरप्रायजेसचे अंकुश गावंडे यांनी सदर कार्यक्रमास प्रायोजित केले. या वर्षी कोविडमुळे उत्कृष्ट छायाचित्रांची प्रदर्शनी घेता आली नाही. पुढील वर्षी निवडक छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजनसुद्धा करण्यात येणार आहे. या आयोजनासाठी महाराष्ट्र पक्षीमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर, कार्यवाह डॉ. गजानन वाघ तसेच पक्षिमित्र अंकाचे सह संपादक किरण मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

*****

# आठवणीतून अशी पाखरे येती ।।
## (मागील अंकावरून)




**जयंत कानडे**

सु. मेजर (निवृत्त)

९१९७६५१५५५६०

E mail : jgkanade@gmail.com


एकदा थंडीच्या दिवसात सायंकाळी अचानक काळे ढग जमून आले. सोसाटयाचा वारा सुटला आणि पावसाबरोबर गारांचा वर्षाव सुरू झाला. गारांचा आकारही सामान्य गारेहून मोठा होता. वर्कशॉपच्या सैनिकांच्या वसाहतीत जुनी मोठी झाडे होती. त्यावर अनेक पक्ष्यांचा रातथारा असे. गारांच्या माऱ्याने अनेक पक्षी मार लागून खाली जमिनीवर पडले. याही संधीचा फायदा घेऊन काही दाक्षिणात्य मित्रांनी मेजवानी उरकून घेतली. मोठया पिशवीत काही पक्षी भरून मला हवे का, म्हणून विचारायला आले होते. आकाशात स्वैर विहरणाऱ्या पक्ष्यांना गलितगात्र अवस्थेत पहावले नाही. मानेनेच नकार दिला. हया गारांचा खच दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत रस्त्याच्या कडेला साठलेला होता. अनेक माणसांनाही दुखापती झाल्याच्या बातम्या होत्या.

उधमपूरला ४ वर्षेपोस्टींग होती. हा परिसर निसर्ग समृध्द आहे. त्यावेळी रेल्वेची सोय नसल्याने जम्मू ते उधमपूर बसने जावे लागे. क्वार्टरच्या मागे डोंगर व जंगल होते. त्यात आवळयाची खूप झाडे होती आणि आवळाही चांगला मोठा असायचा. आवळा तयार झाल्यावर त्याच्यावर पोपट खूप मोठया संस्थेने येत असत. एक दिवस पोपट जवळून पहायला लपत आवळयाच्या झाडाजवळ गेल्यावर एक मजेदार दृष्य पहायला मिळाले. भरपूर आवळे असलेल्या झाडाखाली चक्क चादरी अंथरून ठेवलेल्या होत्या व त्यावर पोपटांनी केलेल्या आवळयाच्या चकत्यांचा थर पडला होता. प्रथम पोपट आवळयातले काय खातात हे कळले नाही. निरीक्षणानंतर कळले की पोपट आवळयाचा बाहेरचा गर खातच नाहीत. आवळयाच्या आतली कठीण बी फोडून त्याच्या आतला थोडासा गर जो बी जमिनीवर पडल्यावर अंकुर म्हणून वर येतो, तो गर पोपटांना आवडतो. चादरीवर पडलेल्या आवळयाच्या चकत्या लोणचे घालण्यासाठी, वाळविण्यासाठी स्थानिक घेऊन जात. यात आमचे सहसैनिकही कमी नव्हते. एकमेकां सहाय्य करू आणखीन काय ? नाही तरी चिमणीच्या दाताने फोडलेली कैरी उष्टी होती नाही, हे बालपणी अनेकांनी अनुभवले असेल. निवृत्तीनंतर माझे मूळ गावी कोकणात पिंपळी येथे कायम वास्तव्यासाठी आलो. गावामध्ये माझी वाशिष्टी नदी किनाऱ्याला लागून एकरभर वरकस जागा आहे. त्यामध्ये आंबा कलमे लावणे व घराजवळ जी मोकळी जागा होती त्यात परस बाग, फुलबाग सुरूवात केल्यानंतर वेळ छान जाऊ लागला.

पक्षी निरीक्षणाचा श्रीगणेशा माझे मामा कै. दत्तात्रय काटदरे यांचे सहवासात सुरू झालाच होता. निवृत्तीनंतर दक्षिण आशियाई पाणपक्षी गणना जानेवारीत होत असे. ती गणना मी पिंपळी येथे कोयना प्रकल्पाच्या चौथा टप्प्याचा अवजल कालवा जेथे वाशिष्टी नदीला मिळतो त्या जागेवर करत असे. दिवसभर भक्ष्य शोधायला बाहेर पडलेले पक्षी सायंकाळी रात थाऱ्यावर जाताना या टप्प्यावर विसावा घेत किंवा थव्याने उडत जात असताना सहज मोजता येत. बरोबर पत्नी असेच व सहयाद्री निसर्ग मित्रचे एक दोन सदस्य असत.या पाणपक्षी गणनेत मुख्यत्वे पाणकावळे, बगळे, टिटवी यांचा आढळ असायचा. त्यावेळी खेर्डी या गावात कराड रोडवर दोन जांभळीची मोठी  झाडे होती. त्यावर पाणकावळे व बगळे यांचा रातथारा असायचा. आता चौपदरीकरणामुळे ती झाडे तोडावी लागली.. असो.

पण या निरीक्षणातून आढळले की पक्षी भक्ष्य शोधायला त्यांच्या रातथाऱ्यापासून पूर्वेकडेच जातात. या पक्षी निरीक्षणासाठी २ ते ३ तास एका जागेवर बसणे होई. सोबत चहा, फरसाण व गप्पा असल्याने कंटाळवाणे होत नसे. पण या वेळेत एक ही पाणपक्षी पूर्वेकडे जाताना आढळायचा नाही.सह्याद्री निसर्ग मित्राच्या स्थापनेनंतर दर सुट्टीच्या दिवशी नियोजित ठिकाणी जमून नदी किनारा, एखादा डोंगर, देव रहाटी पालथी घालायची, यातून झाडे, झुडपे, पक्षी, प्राणी यांची नोंद घेत फिरायचे. पुढच्या सुट्टीत फिरायचे ठिकाण याच वेळी ठरत होते. कारण त्यावेळी लँड लाईन फोन हा सर्वांकडे उपलब्ध नव्हता. त्याचा प्रसार व्हायला सुरूवात झाली होती. यातूनच कोकणातील २३० पक्ष्यांची नोंद असलेल्या 'पक्षी सूची'ची निर्मिती झाली. या पक्षी सूचीमध्ये पक्ष्यांना समर्पक मराठी नावे देण्याचा प्रयत्न झाला. आपण जो निसर्ग पाहातो तो

विद्यार्थ्यांनी पण पहावा, त्यांना निसर्गाची गोडी लागावी यासाठी त्यांना सहभागी करून घेणेसाठी नेचरट्रेल, चित्रकला स्पर्धा, वनौषधी प्रदर्शन इत्यादी कार्यक्रमाचा धडाका सुरू झाला. यातूनच युथक्लब, डब्ल्यूडब्ल्यूएफ, बीएनएचएस यांची ओळख होत गेली, संपर्क वाढत गेला. त्यावेळी चित्रकला किंवा कुठल्याही कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थी मित्रांना डब्ल्य. डब्ल्यु. एफ. ची स्टीकर भेट देत असू. घाट माथ्यावरील खेमसेचे जंगल, परशुरामाचा डोंगर, करंबवणे खाडी तेथील बेट, जंगली जयगड किल्ला, गोवळकोट ते दाभोळ लाँचने प्रवास, गुहागरचा समुद्र किनारा अशा विविध ठिकाणच्या भ्रमंतीतून, विविध कार्यक्रमांतून प्रकाश गोळे, श्रीधर महाजन, रमेश लाडखेडकर, डॉ. सतीश पांडे, वन अधिकारी सुभाष पुराणिक यांच्याशी परिचय होत गेला. हया सर्व कामांमध्ये भाऊ काटदरे, विजय महाबळ, राम मोने, संजय गोडबोले, कमलाकर बेंडके, प्रमोद जोशी, विश्वास जोशी, सचिन पालकर वगैरे मंडळी सोबत असत. यातूनच संस्थेला समुद्र गरुडाच्या कोकणातील सद्यस्थितीचा अभ्यास करणेचा प्रोजेक्ट मिळाला. गुहागर मुक्कामी माझ्या सासुबाई शीतल सिताबाई काटदरे यांच्या बागेत एका उंच आंब्यावर समुद्री गरुडाचे घरटे होते. घरटयावर सी.सी.टी.व्ही. कॅमेरा लावून त्याची नोंद घेण्याचे काम सुरू झाले. यामध्ये पक्ष्याच्या हालचाली नोंद होत होत्या. सूर्याची अगदी कोवळी किरणे घरट्यावर पडायच्या अगोदर एकुलता पक्षी टीव्हीवर दिसायला लागायचा. त्याच्या रंगछटाही सूर्य पूर्ण उगवून मावळेपर्यंत बदलत असत. याप्रमाणे जणू पक्षी सूर्याबरोबरच उगवायचा व सूर्यास्ताला मावळायचा. पक्षी निरीक्षणची पर्वणी

नदीच्या शांत किनाऱ्यावर आरामशीर सावलीत बसून पक्षी निरीक्षण करणे यासारखे दुसरे सुख व मनोरंजन नाही. पाणकावळयांचा सुमारे पन्नास एक पक्ष्यांचा थवा सफाईदार वळण घेऊन डोहात उतरतो. डुलत डुलत २०-२५ मीटर पोहत जातो. त्यात अनेक पक्षी मध्येच डुबी मारून भक्ष्य पकडतात. नंतर थवा थपथप करत उडत मार्गस्थ होतो. ही पर्वणी मी आजवर अनेक वेळा उपभोगीली आहे. आता नदी किना-यावर जाणे शक्य होत नाही. अंगणात बसून पक्षी आंघोळी करताना पहाणे तेव्हढेच आता शक्य आहे.


आज वयाच्या ८० व्या वर्षी वेळ छान जात आहे. अजूनही कोकिळेला शिळ घालून चिडवतो. समाधानाची गोष्ट एवढीच. माझी पत्नी, मुलगा, नात (इंटीरीयर डिझायनर) या सर्वांना निर्सगाची तेवढीच आवड आहे. आज या लेखनाच्या निमित्ताने आठवणीचा पेटारा आपल्यासमोर ओतला आहे.

*****



छायाचित्र- शशांक नगराळे, अमरावती

# झाडे आणि पक्षी



**बाळासाहेब कुलकर्णी**
मो. ९८२२४६५४१०

सृष्टी निर्मात्याने निसर्गातील घटकांचे एकमेकाशी दृढ नातं जोडलेले आहे. झाडे आणि पक्षी यांचं असंच एक सहकार्याचं नातं आपण पाहात आलो आहोत. प्राण्यांना, पक्ष्यांना प्राणवायूची म्हणजे ऑक्सिजनची जरूरी असते तर वृक्ष-वेलींना, वनस्पतींना कार्बनडाय ऑक्साईडची जरूरी असते. त्यामुळेच वनस्पती, वृक्ष-वेली दिवसा प्राणवायू सोडतात आणि प्राणी पक्षी कार्बनडाय ऑक्साईड सोडतात. झाडे वेली फुलाफळांनी बहरतात. फुलातील मध, फळे हे पक्ष्यांचे खाद्य असते. पक्ष्यांची झाडांशी आणि झाडांची पक्ष्यांशी मैत्री होते.

पक्षी झाडांवर विसावा घेतात. झाडेही पक्ष्यांना रातथारा देतात. झाडे पक्ष्यांना हाकलून लावत नाहीत. त्यांच्या प्रजोत्पादनासाठी निवारा म्हणजे घरटी करण्यासाठी मदत करतात. झाडांच्या फांद्यावर, ढोलीमध्ये पक्षी घरटी करुन प्रजोत्पादन करतात. पिलांचं पालनपोषण करून झाडांच्या मदतीनेच त्यांना निसर्गात मुक्त संचार करण्यासाठी उभारी देतात. झाडांच्या समूहावर पक्ष्यांचा रातथारा म्हणजे ' पक्षिधाम' पक्ष्यांसाठीचं हक्काचं विश्रांतीसाठीचं ठिकाण.

पक्षीही झाडांबरोबरचं मैत्रीचं नातं जपत फळे खाऊन बिया भूमीवर टाकून झाडांच्या प्रजोत्पादनासाठी मदत करतात. आपली विष्ठा झाडाखाली टाकून खतांच्या रूपाने जमिनीमार्फत झाडांच्या वाढीसाठी मदत करतात. निसर्गचक्रातील हे संक्रमण सतत चालू असतं.त्यामुळेच सजीव सृष्टी बहरलेली आपण पाहातो.' जीवो जीवस्य जीवनम् ' या नात्याने हे आपण अनुभवत आहोत. मानवी वस्तीच्या परिसरात, गावात, शहरांजवळील बागांमधून असलेल्या मोठमोठ्या झाडांच्या सान्निध्यात पक्ष्यांचा रातथारा असतो. त्या ठिकांनाना मी 'पक्षिधाम' म्हणतो. सांयकाळी एकेमेळी रात्रीच्या मुक्कामासाठी पक्षी झाडांच्या फांद्यावर वस्ती करतात. थव्याने येऊन किलबिल करत ठरलेल्या झाडांवर विसावा घेतात. जसजशी रात्र होईल तसा त्यांचा आवाज शांत होतो.उषःकाल होताच ते जागे होतात. अमरभूपाळी चित्रपट गीतातील शब्द आठवतात

**सांयकाळी एकेमेळी द्विजगण अवघे वृक्षी ।**
**अरुणोदय होताच उडाले चरावया पक्षी ।।**

झाडे आणि पक्षी यांचं नातं कसं आहे ते वरील ओळींमधून समजतं.

या ठिकाणी एक त्रिसूत्री लक्षात ठेवावी. ती म्हणजे, 'चाला, पहा, ऐका'. झाडे आणि पक्षी पाहाण्यासाठी आपण चाललं पाहिजे. अवतीभोवतीचं निरीक्षण करीत पक्ष्यांचे आवाज ऐकले तर आपलं निसर्गाशी असलेलं नातं अधिक जवळीक साधतं.सकाळची, सांयकाळची वेळ पक्षी निरीक्षणासाठी योग्य असते. पक्ष्यांची व झाडांचीही ओळख होते.

*****



# महाराष्ट्र पक्षीमित्रचे पुरस्कार

येत्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनात सोलापूर येथे प्रदान केले जाणारे पुरस्कार

गेली चार दशके महाराष्ट्रात पक्षिविषयक कार्य करणारी संस्था महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, यावर्षीचा पक्षीमित्र जीवन गौरव पुरस्कार आदरणीय मारुती चितमपल्ली यांना जाहीर करण्यात



**पक्षीमित्र जीवन गौरव पुरस्कार**
**आदरणीय मारूती चितमपल्ली**

आला. इतर पुरस्कारांमध्ये पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार तांदलवाडी जि. जळगाव येथील श्री. उदय सुभाष चौधरी यांना तर पक्षी संशोधन पुरस्कार डॉ. अमोल सुरेश रावणकर अचलपूर व श्री. किरण मोरे, अमरावती यांना विभागून देण्यात आला आहे आणि पक्षी जनजागृती पुरस्कार नाशिक येथील श्री. सतीश गोगटे यांना जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे २०१९ पासून या पुरस्कारांची सुरुवात करण्यात आली असून पक्षीमित्र जीवन गौरव पुरस्कार, पक्षीमित्र पक्षी संवर्धन–सुश्रुषा पुरस्कार व पक्षीसंशोधन पुरस्कार व पक्षी जनजागृती पुरस्कार असे चार पुरस्कार दरवर्षी देण्यात येत असतात. या पुरस्कारांचे वितरण पुढील ३४ व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनात करण्यात येणार आहे.

यावर्षीचा स्व. रमेश लाडखेडकर पक्षीमित्र जीवन गौरव पुरस्कार हा दीर्घकाळ पक्षीमित्र चळवळीत राहून, पक्षी संवर्धन व जनजागृती यासाठी कार्यरत पक्षीमित्र चळवळीतील मार्गदर्शक, ज्येष्ठ सभासद, तथा पर्यावरणलेखक मा. श्री. मारुती चितमपल्ली यांना जाहीर करण्यात आला आहे. रोख रक्कम, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून या वर्षी हा पुरस्कार विदर्भ पक्षीमित्र मंचाद्वारे डॉ. अनिल पिंपळापुरे यांचेतर्फे प्रायोजित करण्यात आला आहे. द्वितीय पुरस्कार स्व. डॉ. जी. एन. वानखेडे स्मृती पक्षीमित्र पक्षीसंवर्धन व सुश्रुषा पुरस्कार हा पक्षीमित्र चळवळीतील पक्षी संवर्धन, अधिवास संवर्धन तथा जखमी पक्षी उपचार आदी क्षेत्रात कार्यरत पक्षीमित्र सभासद, तथा चातक संस्थेसोबत कार्यरत असलेले पक्षीमित्र श्री. उदय सुभाष चौधरी, जि. जळगाव यांना जाहीर करण्यात आला आहे. रोख रक्कम, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून हा पुरस्कार स्व. डॉ. जी. एन. वानखेडे मेमोरिअल फंडतर्फे प्रायोजित करण्यात आला आहे.

यावर्षीचा तिसरा पुरस्कार स्व. डॉ. व्ही.सी. आंबेडकर स्मृती पक्षीमित्र पक्षी संशोधन पुरस्कार हा पक्षीमित्र चळवळीत राहून पक्षी अभ्यास, संशोधन, प्रकाशने आणि जनजागृती आदी क्षेत्रात कार्यरत, संशोधन क्षेत्रात कार्यरत सभासद डॉ. अमोल सुरेश रावणकर, अचलपूर व श्री. किरण मोरे, अमरावती यांना विभागून देण्यात आला आहे. रोख रक्कम, मानपत्र आणि

स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून या वर्षी हा पुरस्कार वाईल्ड लाइफ हेरिटेज कन्झर्वेशन सोसायटी, नाशिकतर्फे प्रायोजित करण्यात आला आहे.

चौथा पुरस्कार स्व. ईश्वरदयाल गौतम स्मृती पक्षीमित्र पक्षी जनजागृती पुरस्कार हा पक्षीमित्र चळवळीत राहून पक्षी अभ्यास आणि जनजागृती आणि नांदूरमध्यमेश्वर पक्षी अभ्यास आदी क्षेत्रात कार्यरत सभासद नाशिक येथील श्री. सतीश गोगटे यांना जाहीर करण्यात आला आहे. रोख रक्कम, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून यावर्षी हा पुरस्कार नेस्ट संस्था (NEST), पालघर, द्वारा श्री. सचिन मेन यांचे तर्फे प्रायोजित करण्यात आलेला आहे.

या पुरस्काराळचे वितरण महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनात करण्यात येणार असून ३४ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन सोलापूर येथे २०२१ मध्ये होणार असून या पुरस्कारांचे वितरण या संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

*****

## महाराष्ट्र पक्षीमित्र पुरस्कार २०२०



**पक्षी संवर्धन व सुश्रृषा पुरस्कार**

श्री. उदय सुभाष चौधरी





**पक्षी जनजागृती पुरस्कार**

श्री. सतीश गोगटे



**पक्षी संशोधन पुरस्कार**

श्री. किरण मोरे



**पक्षी संशोधन पुरस्कार**

डॉ. अमोल रावणकर

# स्थानिक पक्षी व त्यांच्या अस्तित्वासाठी-९ मे
# ‘प्रदेशनिष्ठ पक्षी दिवस’



श्री. हेमराज पाटील
चोपडा

निसर्गसाखळीतील पक्षी हा अत्यंत महत्त्वाचा जैव घटक आहे. भारतात नुकतीच स्टेट ऑफ इंडियन बर्डस म्हणजेच वर्तमान स्थितीत भारतातील पक्ष्यांची स्थिती काय आहे, यासंबंधीचा अभ्यासपूर्ण आढावा बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, मुंबई व इतर संशोधन संस्थांच्या आधारे सादर करण्यात आला. यात काही स्थानिक पक्षी दिवसेंदिवस कमी होत चालले आहत असा धोकादायक आलेख समोर आला आहे. अशा पक्ष्यांचं अस्तित्व राखण्यासाठी सर्वप्रथम त्यांचा नैसर्गिक अधिवास सुरक्षित राखणे ही महत्त्वाची जबाबदारी ठरते. म्हणजेच पक्षी अधिवासावर आक्रमण होऊ देऊ नये..

शेकडो प्रकारचे पक्षी दरवर्षी भारतामध्ये हजारो मैल स्थलांतर करतात. तर काही पक्षी प्रजाती त्याचा नैसर्गिक परिसर कधीही सोडत नाहीत. ही वस्तुस्थिती ध्यानात आल्यानंतर त्यांचा अधिक अभ्यास करण्याच्या तसेच त्यांच्या अधिवासाचा गरजप्रमाणे संरक्षण पुरविण्याच्या हेतूने ९ मे हा दिवस ‘प्रदेशनिष्ठ पक्षी दिवस’ साजरा होऊ लागला आहे. एकाच परिसरात पूर्ण आयुष्य जगणाऱ्या पक्ष्यांना प्रदेशनिष्ठ (एपवशाळल) म्हणतात. हे पक्षी आपल्या भारतात मोठ्या संख्येने आढळतात. दक्षिण आशियातील प्रदेशनिष्ठ पक्ष्यांपैकी ३६ टक्के भारतात आहेत.

२०१५ मध्ये भारतात प्रथम हा दिवस पाळण्यात आला. ग्लोबल बिग डे ह्याच दिवशी साजरा केला जातो. यानुसार एका दिवसात म्हणजे २४ तासात पक्ष्यांच्या अधिकाधिक जातींची नोंद करण्याचे आव्हान पेलले जाते.

सजीव सृष्टीतील सर्व सजीवांच्या योग्य वाढ आणि विकासासाठी त्यांचा नैसर्गिक हॅबिटॅट अनुकूल असला पाहिजे. असे न झाल्यास त्या सजीवाचे अस्तित्व धोक्यात येते. तब्बल ५६७ जातींचे पक्षी जगात इतरत्र नाही तर फक्त भारतातील त्या विशिष्ट परिसरातच जगू शकतात. उदा. २००६ सालीच असे आढळून आले की, रीड बॅब्लरची प्रजात फक्त हिमाचल प्रदेशात आढळते. तसेच फॉरेस्ट आऊलेट ही घुबडाची प्रजात फक्त सातपुड्यात पुन्हा ११४ वर्षांनी म्हणजे १९९७ मध्ये आढळली. या पक्ष्यांचा अधिवास नष्ट झाला तर तेजाणार कुठे? त्यामुळे अधिवासाच्या जपणुकी बद्दल जागृती होणे अत्यंत गरजेचे आहे..

यासाठी आपण जबाबदार नागरिक म्हणून स्थानिक प्रजातींच्या पक्ष्यांचे निरीक्षण करणे, नोंदी ठेवणे, वृक्षतोड थांबवणे. निसर्गात जिरू न शकणारा कचरा न करणे, जनजागृती करणे इत्यादी कृती करू शकतो. तसेच वर्तमान ऋतूत उन्हाळ्याच्या दिवसात घरांच्या खिडकीत, छतावर, बाल्कनीत, झाडांवर पक्ष्यांसाठी भांडभर पाणी व अन्नधान्य देऊन देखील स्थानिक पक्ष्यांसाठी मोठी मदत करू शकतो.



छायाचित्र -किरण मोरे, अमरावती

# श्रद्धांजली - वनसंरक्षक माधवराव गोगटे



त्या दिवशी सकाळी व्हॉटस्ॲप बघितलं आणि धक्काच बसला. माधवराव गोगटे यांच्या निधनाची बातमी होती तिथे. हा महिना धक्के देणारा होता. डॉ. विनय ठकार, उल्हास राणे आणि गोगटेसाहेब या तिघांना कोरोनानं उचललं होतं.

माधवराव नाशिक येथे वनसंरक्षक पदावर असताना आमच्या पक्षीमित्र मंडळाशी त्यांचा विशेष संबंध जडला होता. कित्येकदा ते आम्हाला घेऊन पक्षिनिरीक्षण मोहिमेवर गेले होते. एका रविवारी दारणा डॅम बॅक वॉटरवर पक्षिनिरीक्षण करून परत येत असताना पांडवलेण्याच्या अलीकडे त्यांनी वाहन थांबविले. 'चला, तुम्हाला एक योजना दाखवतो', असे म्हणत त्यांनी त्यांच्या मागे मला यायला सुचवलं. तेथील नैसर्गिकरीत्या वाढलेल्या वृक्षराजीत फिरवत त्यांनी त्या जागी नैसर्गिक वन उद्यान करण्याची त्यांची कल्पना बोलून दाखविली. पुढे त्याजागी वनोद्यान निर्माण झाले. त्यात स्मृतिवनही तयार झाले.

माधवरावांचे वडील-दादा- बडोदा संस्थानातून 'शिकार ऑफिसर' या पदावरून निवृत्त झाले होते. तिथे त्यांनी 'टॅक्सिडर्मी'ची कला जोपासली होती. त्यावर पुस्तकही लिहिले होते. ते नाशिकला आले असता त्यांनी आमच्या सभासदांसमोर एक प्रात्यक्षिक करून दाखविले होते.

पुढे गोगटे साहेब मेळघाटला व्याघ्र प्रकल्प संचालक असताना त्यांचा निरोप आला होता. त्यांची बदली होण्याअगोदर तिथे एकदा या, असा तो निरोप होता. त्याप्रमाणे आम्ही पाच जण तिथे पोहोचलो; पण आम्ही तिथे थडकण्यापूर्वीच त्यांना कामानिमित्त बाहेरगावी जावे लागले होते. तिथल्या पाच-सहा दिवसांच्या मुक्कामात आम्हाला भरपूर वनभ्रमंती करता आली.

निवृत्तीनंतर ते पुण्याला स्थायिक झाले होते. तिथे त्यांचा मुलगा डॉ. परीक्षित दंतचिकित्सक म्हणून कार्यरत असतो. पुण्याच्या मुक्कामात ते पोहोणे, बागकाम, व्याख्याने, लेखन या उपक्रमात व्यग्र असत. किरकोळ आजार आहे, त्याचं काय एवढं म्हणत त्यांनी थोडं दुर्लक्ष केलं आणि तिथेच कोरोनाने घात केला.

त्यांच्या मृत्यूपूर्वी काही महिने अगोदर त्यांचा फोन आला होता. १९९७ सालच्या ठाणे येथील सतराव्या पक्षीमित्र संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्या अध्यक्षीय भाषणातील काही संदर्भ त्यांना त्यांच्या लेखासाठी हवे होते. स्थळप्रत त्यांच्याकडे नव्हती. ते भाषण संमेलनातील स्मरणिकेत छापलेले असेल अशी शक्यता होती. म्हणून ते चौकशी करत होते. मी ठाणे येथील संमेलन आयोजकांना फोन करून चौकशी केली तेव्हा स्मरणिकाच निघालेली नव्हती, हा खुलासा झाला. त्यांना हवा तो संदर्भ मिळू शकला नाही.

मुंबई येथील अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूलमध्ये त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. १९६४ मध्ये त्यांनी इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधून वनस्पतिशास्त्र आणि प्राणिशास्त्र या विषयात बी.एस्सी.चे शिक्षण पूर्ण केले. तसेच तारापोरवाला मत्स्यालय मुंबईमधून त्यांनी एम.एस्सी. पूर्ण केले. वनांबद्दल, पशुपक्ष्याबद्दल लहानपणापासूनच त्यांना प्रेम होते. १९६४ मध्ये महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या वनविभागाच्या परीक्षेत ते महाराष्ट्रात पहिले आले. १९६६ मध्ये वनसेवा ही अखिल भारतीय सेवा करण्यात आली. १९६८ मध्ये गोगटे यांनी परीक्षा दिली आणि त्यांची भारतीय वनसेवेमध्ये निवड झाली आणि महाराष्ट्रात नियुक्ती करण्यात आली. १९६८-६९ या वर्षी ते परिविक्षाधीन अधिकारी म्हणून मेळघाटातील अत्यंत निबिड अशा कोट्टू या ठिकाणी कार्यरत होते. मेळघाटातील जैववैविध्य या काळात त्यांनी अभ्यासले या अनुभवाचा त्यांना पुढील काळात खूप उपयोग झाला. वने म्हणजे फक्त वृक्षच नाहीत तर वनांसोबत वाढणाऱ्या इतर जीवसृष्टीचेदेखील आपण जतन केले पाहिजे, तरच आपण खऱ्या अर्थाने जैववैविध्य जोपासू शकतो, हे तत्त्व गोगटे यांनी वन विभागातील आपल्या कार्यकाळात कसोशीने पाळले

१९७२ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता.

त्यावेळी माधवराव गोगटे यवतमाळमध्ये काम करत होते. या काळात त्यांच्या असे लक्षात आले की, दुष्काळाचा पहिला परिणाम सगळ्यात आधी वनातील चाऱ्यावर होतो. चाऱ्याअभावी दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांना गायी-गुरे विकावी लागतात, कसायाच्या हवाली करतात. त्यांना त्यामुळेच निसर्गत:च उपलब्ध होणाऱ्या गवती कुरणांचे व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे. या दुष्काळाने त्यांचा वनांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. त्यांनी गवती कुरणांचे व्यवस्थापन या विषयावर सखोल अभ्यास केला. गवत नैसर्गिकरीत्याच वाढू देणे, बी आल्यावरच त्यांची कापणी करणे यामुळे चांगल्या प्रतीचे गवत नैसर्गिकरीत्याच निर्माण होऊ शकते. अशा गवताचे पुनरुत्पादनाच्या दृष्टीने संवर्धन केल्यास आपण दुष्काळातदेखील टिकून राहू शकतो, हे गोगटे यांनी संशोधनाने सिद्ध केले.

१९८० ते १९८४ या कालवधीत गोगटे डेहराडून येथील वन अनुसंधान केंद्रात वानिकिशास्त्राचे (सिल्विकल्चर) संशोधक म्हणून कार्यरत होते. या संशोधनाचा त्यांना नंतरच्या काळात मेळघाट व्याघ्रप्रकल्पात काम करताना खूप उपयोग झाला. गवती कुरण व्यवस्थापनाच्या गोगटे यांच्या कामामुळेच १९८६-८७ च्या दुष्काळामध्ये वनविभागाकडून पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात चारा वनविभागाकडून उपलब्ध करून देण्यात आला. गोगटे यांच्या या कामाची दखल घेऊन भारत सरकारने नॅशनल वेस्टलँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या माध्यमातून 'नाशिकमधील गवती कुरणांचे व्यवस्थापन : एक यशोगाथा' (ग्रीनिंग ऑफ ग्रासलँड इन नाशिक : असक्सेस स्टोरी) या पुस्तकाचे प्रकाशन केले.

१९८७ ते १९९१ या काळात गोगटे यांची नियुक्ती संचालक व्याघ्रप्रकल्प, मेळघाट या पदावर करण्यात आली. याकाळात त्यांनी तेथील जैववैविध्य या विषयावर अभ्यास केला. मेळघाटाच्या व्याघ्रप्रकल्पाकडे पर्यटनाच्या दृष्टिकोनातून त्यापूर्वी पाहिले गेले नव्हते. गोगटे यांनी मेळघाट व्याघ्रप्रकल्पाच्या पर्यटन व्यवस्थापनाचे महत्त्वपूर्ण काम केले. मेळघाटातील वनस्पतींच्या प्रजाती, पक्षी वैविध्य, स्थानिक कोरकू आदिवासींची जीवनपद्धती या सर्व गोष्टींचा विचार करून त्यांनी मेळघाट व्याघ्रप्रकल्पाचा आराखडा तयार केला. तेथे पर्यटनासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांची उभारणी केली. मेळघाटात पर्यटक फक्त वाघ पाहायला जायचे. परंतु गोगटे यांनी आपल्या प्रयत्नांतून मेळघाटातील जैववैविध्याकडे पर्यटकांचे लक्ष वेधले. या महत्त्वपूर्ण योगदानामुळे माधव गोगटे यांना १९९२-१९९३ मेरिटोरियस सर्व्हिस फॉर टायगर कॉन्झर्व्हेशन हा पुरस्कार देऊन भारत सरकारकडून गौरवण्यात आले. १९९१-१९९५ वनसंरक्षक संशोधन या पदावर पुणे येथे कार्यरत असताना गोगटे यांनी इकॉलॉजिकल ऑडिट ऑफ टीक प्लॅंटेशन या विषयावर शास्त्रोक्त संशोधन केले. या संशोधनाबद्दल त्यांना वनसंशोधन क्षेत्रातील मानाच्या समजल्या जाणाऱ्या बॅंडिस पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मुख्य वनसंरक्षक वन्यजीव या पदावर १९९७ ते २००० या काळात गोगटे नागपूर येथे कार्यरत होते. यावेळी महाराष्ट्रातील सर्व अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने यांच्या व्यवस्थापनाचे महत्त्वाचे काम गोगटे यांच्याकडे होते. व्याघ्रप्रकल्पातील गोगटे यांच्या महत्त्वपूर्ण कामाबद्दल त्यांना इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्वेशन ऑफ नेचर या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या कॅट स्पेशालिस्ट ग्रुपचे मानद सभासदत्व १९९२ मध्ये बहाल करण्यात आले. नोव्हेंबर २००३ मध्ये माधवराव गोगटे प्रधान मुख्य वनसंरक्षक वन्यजीव या पदावरून नागपूर येथून निवृत्त झाले.

निवृत्तीनंतर गोगटे यांनी वनसंवर्धन आणि संशोधन या क्षेत्राबद्दल वृत्तपत्रांमधून लिखाण सुरू केले. ॲग्रोवन या वृत्तपत्रामध्ये त्यांनी वृक्षांची ओळख करून देणारी ॲग्रो फॉरेस्ट्री या विषयावरील लेखमालिका वर्षभर चालवली. २००४ ते २००७ या कालावधीत ते सेवानिवृत्त वनकर्मचारी संघटनेचे अध्यक्ष होते. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी पुणे येथे शहरातील वनीकरण या विषयावर विविध उपक्रमांचे आयोजन केले. सामान्य माणसांमध्ये वनांबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी या तीन वर्षांच्या कालावधीमध्ये त्यांनी सातत्याने लिखाण केले. वनांबाबत जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी विविध कार्यशाळांचे आयोजन केले. त्यांचे वनव्यवस्थापन आणि संशोधन या विषयावरील तीनशेहून अधिक लेख वृत्तपत्रे, मासिके, संशोधन प्रकल्प यांमधून आजवर प्रकाशित झाले आहेत.

डिसेंबर २००७ मध्ये जपानच्या जॅपनीज बँक फॉर इंटरनॅशनल ऑपरेशन या बँकेने ओरिसा सरकारला सहाशे पन्नास कोटी रुपयांची वनव्यवस्थापनासाठी मदत दिली. या प्रकल्पाबाबत ओरिसा सरकारला सल्ला देण्यासाठी, तसेच ओरिसा सरकार हा प्रकल्प कशा प्रकारे राबवत आहे, याचे निरीक्षण करणाऱ्या जपानच्या 'निप्पोन कोईका' या आंतरराष्ट्रीय सल्लागार संस्थेचे सल्लागार म्हणून गोगटे यांची नेमणूक झाली. या प्रकल्पासाठी त्यांनी तीन वर्षेकाम केले. अशा या अभ्यासू व्यक्तीच्या निधनाने आपण एका वनसंवर्धकास मुकलो आहोत. त्यांना ही आदरांजली.

**-दिगंबर गाडगीळ**

*****

# श्रद्धांजली -पर्यावरणाचा खरा शिलेदार



गेल्या दोन दशकात पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन हे अगदी परवलीचे शब्द झाले आहेत. याच उद्देशाने या कार्यात अनेक संस्था अक्षरश: फोफावल्या आणि तथाकथित पर्यावरणप्रेमींचा जन्म झाला. त्याला करिअरची जोडदेखील मिळाली, पण ऐंशीच्या दशकात या पद्धतीची कोणतीही रचना अस्तित्वात नसताना अनेक जण पर्यावरण चळवळीकडे वळले. चळवळे आंदोलनकर्तेइतकीच भूमिका न राहता विधायक रचना मांडणारी व्यक्तिमत्त्वेही तयार झाली, उल्हास राणे त्यापैकीच एक.

ऐंशीच्या दशकात पर्यावरण चळवळींना जसा वेग आला तशीच शासकीय पातळीवरदेखील या बाबींना चालना मिळत गेली. पण हल्लीसारखे केवळ शोधनिबंधाचे रकाने भरायचे असे त्याचे स्वरूप अजिबात नव्हते. मानवाचे आणि निसर्गाचे अतूट नाते आणि पर्यावरण संवर्धन अशी सांगड घालणाऱ्यांचा तो काळ याच काळात बीएनएचएसच्या माध्यमातून उल्हास राणे डॅनीयल, सालीम अली, हुमायून अब्दुलअली अशा थोरांच्या संपर्कात आले. एकीकडे वास्तुविशारद म्हणून व्यवसाय सुरू करण्याची धडपड, तर दुसरीकडे निसर्गात रममाण होत, त्याविषयी काही तरी करण्याची ऊर्मी उल्हास राणे यांनी दोहोंची सांगड घालत संपूर्ण कारकीर्द सुरेख गुंफली.

पर्यावरणप्रेमी म्हणजे आक्रस्ताळ्या भाषेत प्रकल्पांना विरोध करणारा अशीच प्रतिमा गेल्या दोन दशकात निर्माण झाली आहे, पण उल्हास राणे हे या प्रतिमेला वेगळ्या पद्धतीने छेद देऊन जगले. अत्यंत शांत, मृदू भाषेत, पण तरीदेखील अतिशय ठामपणे आपला मुद्दा मांडणे ही त्यांची हातोटी, अगदी अखेरपर्यंत त्यांनी ती जपली.

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय (पूर्वीचे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम) या संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध. बीएनएचएसचे ते मानद सचिव, तर संग्रहालयाचे विश्वस्त. दोन्ही ठिकाणी त्यांनी लोकशिक्षणाला प्राधान्य दिले.

पूर्ण वळ व्यावसायिक वास्तुविशारदाचे काम सुरू करतानाच पर्यावरणाशी असलेले नातेही त्यांनी जपले. लोकशिक्षण आणि लोकसहभाग हा त्यांच्या कामाचा गाभा होता ज्याचा वारसा त्यांना थेट सालीम अली आणि हुमायुन अब्दुलअली यांच्याकडून मिळाला होता. तो त्यांनी प्राणपणाने जपला.गेल्या पाच दशकात शेकडो संस्थांच्या माध्यमातून ते आपली भूमिका मांडत राहिले. इतकेच नाही तर व्यावसायिक कौशल्य आणि शहरातील पर्यावरण यांची मांडणी करणारी अनेक उदाहरणे त्यांनी निर्माण केली. देशातले 'शहरातील पहिले निसर्ग उद्यान' म्हणून ओळखले जाईल अशा धारावातील महाराष्ट्र निसर्ग उद्यानाच्या रचनेत, जडणघडणीत त्यांचा पुढाकार होता. आसाममध्ये त्यांनी देशातील पहिले फुलपाखरू उद्यान साकारले.

लोकसहभागातून शिक्षण आणि पर्यावरण संवर्धन हे कायमच केंद्रस्थानी होते. त्यातूनच महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेच्या कामात सक्रिय झाले. नव्वदच्या दशकात पक्षिनिरीक्षण हे तसे मर्यादित पातळीवरच असायचे, पण राज्यभरातील असे हौशी, अभ्यासू पक्षिप्रेमी एकत्र आले आणि त्यातूनच मग पुढे महाराष्ट्र पक्षीमित्र ही चळवळच सुरू झाली. हा विषय केवळ छंदाच्या पातळीवर न राहता त्यातून विधायक कामे होऊ लागली. नाशिक जिल्ह्यातील नांदूर मधमेश्वर येथील पाणथळ जागा पक्षी अभयारण्य म्हणून घोषित व्हावी यासाठी या पक्षिमित्राने जोरदार मोहीम उघडली. उल्हास राणेंनी बीएनएचएस, जागतिक वन्यजीव निधी अशा संघटनांचे पाठबळदेखील मिळवले आणि हे अभयारण्य घोषित झाले. पुढे भीमाशंकरसाठी तर स्थानिकांनादेखील तेथील जैवविविधतेचे महत्त्व पटवून देत त्याला अभयारण्याचा दर्जा मिळवून दिला. त्याचबरोबर सह्याद्री वाचवा मोहीम, पश्चिम घाट बचाव आंदोलन यात त्यांचा सक्रीय सहभाग होता.

महाराष्ट्र पक्षीमित्र ही केवळ एक संस्था न राहता चळवळ झाली. यामध्ये उल्हास राणे यांचा सहभाग महत्त्वाचा आहे. केवळ शास्त्रीय भाषेत पर्यावरण न मांडता, सोप्या आणि सहज भाषेत विषय उलगडून सांगणे हा त्यांचा हातखंडा. इतकेच नाही तर ललित लेखनाच्या माध्यमातून विज्ञानाचा अपलाप होऊ न देता त्यांनी विपुल लिखाण केले.

ज्या भीमाशंकर क्षेत्रास अभयारण्य घोषित करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले तेथील प्लास्टिकचा अनिबंध कचरा पाहून ते व्यथित झाले. भीमाशंकर हे 'प्लास्टिकचे अभयारण्य झाले आहे, अशीच त्यांची भावना होती. आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांचे वास्तव्य बंगळूरु येथे होते. करोनासारख्या आजाराने त्यांना गाठले आणि अखेरपर्यंत कार्यरत असलेल्या या पर्यावरणप्रेमीचा अंत झाला.

*****

# पक्षी सप्ताह -२०२० दरम्यान राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन

भारतीय पक्षिविश्व व पक्षिअभ्यासशास्त्रास जागतिक स्तरावर पोहोचवणारे पै. डॉ. सालिम अली व महाराष्ट्रातील तमाम पक्षिनिरीक्षकांसाठी कायम आदरस्थानी असलेले ऋषितुल्य व्यक्तिमत्व आदरणीय मारुती चितमपल्ली या दोन्ही उत्तुंग व्यक्तींचा जन्मदिवस हा नोव्हेंबर महिन्यात येतो. मारुती चितमपल्ली यांना त्यांचे जन्मदिनी शुभेच्छा. महाराष्ट्र पक्षीमित्र संघटने तर्फे ०५ नोव्हेंबर या आ. मारुती चितमपल्ली यांचे जन्मदिनापासून ते १२ नोव्हेंबर या पै. डॉ. सालिम अली यांचे जयंतीपर्यंतचा आठवडा पक्षिसप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो. महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे गेल्या चार वर्षापासून साजरा केला जाणारा पक्षी सप्ताह यावर्षीपासून शासन स्तरावरूनसुद्धा साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने राज्यात वन विभाग आणि पक्षिमित्र यांचेतर्फे पक्षी सप्ताह मोठ्या उत्साहात राज्यभर साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र पक्षीमित्र आणि वन विभागाकडून दि. ५ नोव्हेंबर रोजी या सप्ताहाचे उद्घाटन अमरावती येथे वडाळी बांबू गार्डन येथे पार पडले. या कार्यक्रमासाठी अमरावतीचे उपवनसंरक्षक श्री. चंद्रशेकरन बाला, महाराष्ट्र पक्षीमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर, राज्य वन्यजीव मंडळाचे सदस्य श्री. यादव तरटे, विभागीय वनाधिकारी हरिचंद्र वाघमोडे, सहायक वन संरक्षक लीना आडे व ज्योती पवार, व गणेश पाटोळे, महाराष्ट्र पक्षीमित्रचे कार्यवाह डॉ. गजानन वाघ, उपजिल्हाधिकारी इब्राहीम चौधरी, वनपरिक्षेत्र अधिकारी कैलाश भुंबर, वन अधिकारी व कर्मचारी तसेच पक्षीमित्रचे डॉ. श्रीकांत वर्हेकर, किरण मोरे, सौरभ जवंजाळ, अनेक पक्षिमित्र तथा निसर्गप्रेमी यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांचे हस्ते फीत कापून कार्यक्रमाचे उद्घाटन पार पडले. यावेळी पक्षी सप्ताह बाबत उपवनसंरक्षक श्री. चंद्रशेकरन बाला, डॉ. जयंत वडतकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यानंतर वडाळी तलाव आणि बांबू गार्डन येथे पक्षी निरीक्षण व नोंदणी कार्यक्रम पार पडला. या मध्ये सुमारे ५० पेक्षा जास्त पक्षी निरीक्षकांनी आपली उपस्थिती दर्शविली. या दरम्यान एकूण ४५ प्रजातींचे वेगवेगळे पक्षी नोंदविले गेले. पूर्ण आठवडाभर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये अमरावती जिल्ह्यातील विविध ठिकाणी वनविभागातील कर्मचाऱ्यांसाठी व पक्षिप्रेमींसाठी पक्षिनिरीक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांसाठी प्रा.डॉ.गजानन वाघ आणि सहा. वन वनसंरक्षक श्रीमती लीना आडे यांचे पुढाकाराने वन विभाग विभाग अमरावती तर्फे पक्षी प्रश्नमंजुषा ऑनलाईन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. पक्षिअभ्यासक निनाद अभंग यांनी सालिम अली व मारुती चितमपल्ली यांचे रेखाटन असलेले उत्कृष्ट पोस्टरचे उद्घाटन करण्यात आले. हे पोस्टर सर्व महाराष्ट्र भर पक्षी सप्ताहामध्ये लोकप्रिय झाले. तसेच अकोला येथील निसर्गकट्टाचे अमोल सावंत यांनी तयार केलेला पक्षी सप्ताहाचा लोगो प्रत्येक कार्यक्रमात अधिकृतरीत्या वापरण्यात आला. बहार नेचर फाउंडेशन, वर्धा व महाराष्ट्र पक्षीमित्र व्दारा आयोजित निसर्ग अभ्यासक आ. उल्हास राणे स्मृतिप्रीत्यर्थ पक्षी सप्ताहा निमित्ताने लाईव्ह फेसबुक व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये डॉ. अनिल पिंपळापुरे, डॉ. राजू कसंबे, डॉ. जयंत वडतकर, डॉ. मधुमिता पाणिग्रही, कु. साहिला कुडाळकर, श्री. राजदीप राठोड, श्री. वैभव देशमुख श्री. दर्शन दुधाने यांनी व्याख्यानमालेमध्ये पक्ष्यांची उत्कृष्ट माहिती दिली. ५ ते १२ नोव्हेंबर सायंकाळी ५ ते ८ वाजता फेसबुक लाईव्हमध्ये या व्याख्यानांचा आस्वाद महाराष्ट्रतल्या पक्षिमित्रांनी घेतला. अलीकडच्या काळात तरुणांचा पक्षी छायाचित्राणातील कल बघता त्यांच्यासाठी वन्यजीव पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती व महाराष्ट्र पक्षीमित्र तर्फे पक्षी छायाचित्रण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये पूर्ण महाराष्ट्रातून पक्षी छायाचित्रकारांनी आपला सहभाग नोंदविला. या स्पर्धेतील सहा विजेत्यांना बक्षीस वितरण सोहळ्यात २४०००/- रुपयांचे बक्षीस व स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना संधी देण्यासाठी महाराष्ट्र वन्यजीव संवर्धन व संशोधन संस्था, परभणी व शिक्षण विभाग जिल्हा परिषद परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने पक्षी सप्ताह निमित्ताने ऑनलाईन प्रश्नमंजुषाचे आयोजन करण्यात आले होते. सोबतच पक्ष्यांविषयी लेखन, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वाचन, पक्षी प्रकल्प इ. उपक्रम राबविण्यात आले. किरकसाल, सातारा येथे विविध ठिकाणी पक्षिनिरीक्षण, स्लाईड

शो. ई–बर्ड कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये दहिवडी वनपरिक्षेत्र अधिकारी एम.पी. मुळे, पक्षिमित्र चिन्मय सावंत, विशाल काटकर यांनी मार्गदर्शन केले.

अकोला वन्यजीव विभाग व निसर्गकट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने अकोला येथे पक्षी निरीक्षण, नोंदणी व छायाचित्र प्रदर्शन, अभयारण्यात पक्षी गणना, वेबिनार आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात निसर्ग कट्टाचे संस्थापक श्री अमोल सावंत, प्रा. अमोल शिरभाते आणि त्यांच्या चमूने सहभागींना मार्गदर्शन केले.

निसर्ग प्रेमी मित्र ग्रुप, पेठ वडगाव यांचेमार्फत पक्षी गणना, शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. तसेच पक्ष्यांसाठी महत्वाचा घटक हा वृक्ष असल्याने काटेसावर, वड, पिंपळ, उंबर अशी देशी झाडे वृक्षारोपणसाठी मोफत वाटण्यात आली. कार्यक्रमासाठी निलेश घारसे आणि डॉ. अमोल यांनी परिश्रम घेतले.

चातक निसर्ग संवर्धन संस्था, जळगाव मार्फत आरोग्य विभागासाठी पक्षिनिरीक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्री. उदय चौधरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी विविध पक्ष्यांची ओळख करून दिली. ग्रीनफ्रेंडस नेचर क्लब, लाखनी, भंडाराच्या साकोली ग्रुपतर्फे खैरलांजी व नवतळा येथे पक्षिनिरीक्षणाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रीनफ्रेंड्स चे संघटक प्रा. अशोक गायधने, कु. मृणाल राउत, आदित्य वाघमारे, युवराज बोबडे, संकल्प वैद, रितीक शोरी, रोशन बागडे यांनी तसेच खैरलांजीचे पक्षिप्रेमी विद्यार्थी व नागरिक यांनी अथक परिश्रम घेतले.

नेस्ट संस्था, पालघर यांनी रात्री पक्षी गणना, चित्रकला स्पर्धा, पक्षी निवाऱ्याचे सर्वेक्षण, निबंध स्पर्धा आयोजित करून पक्षी सप्ताह साजरा केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिन मेन, रमेश शेनॉय यांनी परिश्रम घेतले. निसर्ग मित्र मंडळ, अहमदनगर यांनी पक्षी सप्ताहानिमित्त पक्षी निरीक्षण आणि 'हेरीटेज वॉक'चे आयोजन केले. यामध्ये पक्षी निरीक्षण व ऐतिहासिक वास्तू माहिती देण्यात आली. पक्षी सप्ताहानिमित्त 'आम्ही लोणारकर ग्रुप' लोणारतर्फे लोणार ते ज्ञानगंगा अभयारण्य हा १२१ किलोमीटरचा प्रवास सायकलने केला. कोल्हापूर जिल्ह्यातील चावरे येथील वाईल्डलाइफ कन्झर्वेशन आणि रिसर्च फौंडेशनच्या वतीने चावरे ते आंबा यादम्यान सायकल सफारीचे आयोजन केले होते. यामध्ये श्री. युवराज पाटील यांनी फेरीदरम्यान पन्हाळा व शाहुवाडी या दुर्गम भागातील गावांना भेटी देऊन पक्ष्यांच्या विषयी जनजागृती केली. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा यवतमाळ महाविद्यालयातील पर्यावरण अध्ययन विभाग आणि ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पक्षी सप्ताहानिमित्त महाविद्यालय प्रश्नमंजुषा घेण्यात आली. वन विभाग व यस अंबाजोगाई ग्रुप यांच्या वतीने पक्षी निरीक्षण व निसर्ग फेरीचे आयोजन करण्यात आले. जळगाव वनविभाग व चातक निसर्ग संवर्धन संस्थातर्फे कृषी महाविद्यालय मुक्ताईनगर विद्यार्थ्यांना पक्षी विषयक मार्गदर्शन करण्यात आले होते.

पक्षी अभ्यासक श्री हेमंत धानोरकर सर यांनी विविध पक्ष्यांचे वर्तन, अधिवास, त्यांचे स्थलांतर व विविध गमती जमती बद्दल माहिती दिली. श्री.बी.एस. गीते साहेब आर.एफ.ओ. परळी/अंबाजोगाई वन विभाग यांच्या हस्ते पक्षी अभ्यासक हेमंत धानोरकर यांचा सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र पक्षीमित्र अकोला वन विभाग निसर्ग कला अकोला, प्राणिशास्त्र विभाग शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला व प्राणिशास्त्र विभाग महात्मा फुले महाविद्यालय, पातूरतर्फे वनपरिक्षेत्रात येणाऱ्या माळराजुरा निसर्ग पर्यटन संकुल येथे पक्षिनिरीक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. धीरज मदने हे होते. निसर्ग कट्टाचे संस्थापक अध्यक्ष श्री. अमोल सावंत, प्राणिशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक व पर्यावरण तज्ञ डॉ मिलिंद शिरभाते व प्राणिशास्त्रविभाग प्रमुख डॉ. अमृता शिरभाते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या परिक्षेत्रात एकूण ५५ पक्ष्यांची नोंद घेण्यात आली. सदर कार्यक्रमाला पातूर वनक्षेत्रातील वनरक्षक, श्री अविनाश घुगे, श्री सुनील राठोड,श्री करोडपती, फुले महाविद्यालयातील प्रा. रोशनी लोमटे, प्रा. प्रानोती खवणे, किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलचे संस्थापक अध्यक्ष श्री गोपाल गाडगे, विद्यार्थ्यांमधून प्रीती देवकर, अनुराधा कराळे, मंगेश वाघमारे, सतीश सांगळे, हर्षवर्धन ढोके, संकल्प खंडारे, फोटोग्राफर अतुल भांगे व निखिल व इतर मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाची सांगता महात्मा फुले महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागात पक्ष्यांचे घरटे वितरित करुन झाली. या वेळी महाविद्यालयाचे शिक्षकेतर कर्मचारी श्री निशांत सदाफळे, श्री पवन काळपांडे व श्री पंकज मडघे उपस्थित होते.

पक्षी सप्ताहामध्ये विविध महाविद्यालय तथा शैक्षणिक संस्था यांनीसुद्धा आपला सहभाग नोंदवून वेबिनार तथा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. यामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय नागभीड, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वरवट बकाल (बुलडाणा), विनायक विज्ञान महाविद्यालय नांदगाव खं. इ संस्थांनी वेबिनारचे आयोजन केले होते. सदर आयोजानाठी प्रा. गणपत देशमुख, प्रा. निखील बोरोडे, प्रा. डॉ. मेघा सोळंके प्रा.माधुरी हिंगणकर, प्रा. सोनाली तायडे, प्रा. सुचिता खोडके, प्रा. डॉ. गजेन्द्रसिंग पचलोरे, डॉ. प्रतिभा महल्ले यांनी परिश्रम घेतलेत.

चंद्रपूर येथील इको-प्रो संस्थेतर्फे जुनोना तलाव येथे पक्षी अधिवास परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी तलावावर पक्षी निरीक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाकरिता, संस्थेचे अध्यक्ष श्री. बंडू धोत्रे. मनपा आयुक्त श्री. राजेश मोहिते, 'एको प्रो'चे पक्षी विभाग प्रमुख श्री बंडू दुधे, श्री. हरीश मेश्राम, मेघशाम पटकुले यांची प्रमुख उपस्थिती होती. संपूर्ण सप्ताहभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

वाशिम जिल्ह्यातील गवताळ प्रदेशासाठी प्रसिद्ध असलेल्या कारंजा सोहळ अभयारण्यात अकोला वन्यजीव विभाग, निसर्ग कट्टा व वत्सगुल्म जैवविविधता संवर्धन संस्था वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने पक्षिसप्ताहानिमित्त 'गवताळ प्रदेशातील पक्षिगणना' या कार्यक्रमाचे आयोजन दि. ७ व ८ नोव्हेंबर २०२० दरम्यान करण्यात आले होते. या कार्यक्रमात अकोला, पातूर बुलढाणा, खामगाव, वाशिम, मालेगाव व परतवाडा या शहरातून १५ पक्षिमित्र सहभागी झाले होते. या निरीक्षणामध्ये ११५ पक्ष्यांची नोंद करण्यात आली आहे. चराई बंदी मुळे या भागात गवताळ प्रदेशात आढळणाऱ्या लालमुनिया, चंडोल, रेखांकित वटवट्या, खाटीक व तितर पक्ष्यांची संख्या मोठ्या प्रमाणात पाह्यला मिळाली. कारंजा सोहोळ अभयारण्या लगतच अढाण डॅमचे बॅकवॉटर असल्यामुळे येथे स्थलांतरित पक्ष्यांचे दर्शन पण झाले. यामध्ये सीगल व रिव्हर टर्नचे दर्शन पक्षिमित्रांना सुखावून गेले. सोबतच निलगाय, चितळ, रानडुक्कर व काळविट यांचे पण दर्शन झाले. बिबट्याच्या ताज्या पाऊलखुणांनी या भागात त्याचे अस्तित्व असल्याची जाणीव करून दिली होती. या पक्षिगणनेची नोंद ई-बर्ड वर पण करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अकोला वनपरिक्षेत्राचे वनक्षेत्रपाल श्री. भानुदास पवार, वनपाल श्री. चौरे, वनरक्षक श्री. ईचे, श्री. बावनथळे व वनमजूर तसेच निसर्ग कट्टाचे अमोल सावंत, प्रेम अवचार, डॉ. मिलिंद शिरभाते, वत्सगुल्म जैवविविधता संवर्धन संस्थेचे श्री. मिलिंद सावदेकर, पुरूषोत्तम इंगळे व निलेश सरनाईक यांनी परिश्रम घेतले. सर्व सहभागींना प्रमाणपत्र देण्यात आले. महाराष्ट्र शासन पुरस्कृत पक्षी सप्ताह निमित्ताने वनविभाग नागभीड आणि झेप निसर्गमित्र बहु. सस्थेतर्फे घोडाझरी अभयारण्यात पक्षी सप्ताहाचे आयोजन करुन पक्षी निरीक्षण व वन भ्रमंतीचा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी उपस्थित वनकर्मचारी आणि पक्षिमित्रांनी पक्षी निरीक्षक श्री. विवेक पवार, तळोधी, पक्षी अभ्यासक श्री. गणपत देशमुख सर नागभीड व पक्षिमित्र राजेन्द्र भाजे नागभीड यांचे मार्गदर्शनाखाली घोडाझरी तलाव परिसर व तलावालगतचे जंगल परिसरातील पक्षी व पक्ष्यांचे अधिवासाची ओळख करत घेतली. ग्रीन प्लॅनेट नेचर क्लबचे श्री. देशमुख सरांनीदेखील जैव विविधतेतील पक्ष्यांचे महत्त्व, प्रदूषण व शहरीकरणाचा पक्ष्यांच्या अस्तित्वावर होणारा परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. महाराष्ट्रात विविध ठिकाणी पक्षी सप्ताहानिमित्त पक्षी अभ्यासकांनी यू-ट्यूब, गुगल मीट, झूम ई-वर पक्षीमित्रांशी संवाद साधला. राज्यातील वन विभागातर्फेसुद्धा प्रत्येक ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या अहवालामध्ये उल्लेखित कार्यक्रमांशिवाय अनेक संस्थांनी कार्यक्रमांचे आयोजनसुद्धा केले होते. त्यांची माहिती उपलब्ध न होऊ शकल्याने त्यांचा या अहवालात समावेश होऊ शकला नाही.


* संकलन *

**श्री. किरण मोरे**

सहाय्यक संपादक

महाराष्ट्र पक्षीमित्र


*****

# टपाल तिकिटांच्या दुनियेत

## निलकंठ

Indian Roller or Blue Jay (Coracias benghalensis)

निलकंठ हा पक्षी चाष कुळातला आहे. या पक्ष्याचा आकार मोठया कबुतरा एवढा असतो. डोके मोठे असून याची चोच चांगलीच जाड असते. तांबुस तपकिरी रंगाची छाती व पोट आणि शेपटीखालचा भाग फिकट निळ्या रंगाचा असतो. पंखाची आतली बाजू व टोके गडद निळया रंगाची असतात. उडताना गडद निळया रंगाचे पट्टे उठून दिसतात. डोक्याच्या वरची बाजू मंद निळ्या रंगाची असते, गळयाभोवती व मानेभोवती निळ्या, तपकिरी पांढरट रंगाचे बारीक बारीक फराटे असतात. नर व मादी दिसायला सारखेच असतात.

आपल्याकडे हे पक्षी हिवाळयामध्ये हिमालयातून स्थलांतर करून येतात. निलकंठ हा माळरानात व विरळ जंगलात वावरणारा पक्षी आहे. दाट जंगलाबाहेर रहावयास त्याला आवडते. शेतातील विजेच्या तारांवर बसून त्याच्या तेज नजरेने नाकतोडे, भुंगे आणि मोठाले कीटक. याशिवाय सरडे, पाली, बेडूक विंचू व अन्नधान्याचे नाश करणारे लहान उंदिर खातो. शेतामध्ये उंच जागी हा पक्षी बसून आजूबाजूस नजर ठेवून असतो, कीटकांनी थोडी जरी हालचाल केली की हा पक्षी त्यावर झेप घालून पकडतो व आपल्या जागेवर येऊन बसतो, नंतर त्यास खातो. त्याची कीटक खाण्याची क्षमता खूप असल्यामुळेच त्याला शेतकऱ्यांचा मित्र मानतात, शेतकरी त्याची पूजा करतात व दसऱ्याला याचे दर्शन शुभ मानले जाते.


निलकंठ हा तेलंगणा तसेच कर्नाटक राज्यांचा राज्यपक्षी आहे. तेलंगणात यास पालपिट्टा असे संबोधले जाते. भारतीय टपाल खात्याच्या तेलंगणा विभागातर्फे दि. १४ डिसेंबर २०१८ रोजी तेलंगणा संस्कृतीवर विशेष आवरणांच्या मालिकेत निलकंठ या पक्ष्यावर विशेष आवरण प्रकाशित केले आहे. या आवरणावर निलकंठाची प्रतिमा व त्याची मुद्रा असलेला शिक्का तिकिटावर मारलेला आहे.

**रवींद्र वामनाचार्य,**
नाशिक
मोबाईल नं. : ९८९०३९०५२७
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in

*****

******



# महाराष्ट्र पक्षीमित्रचे
## आजच सभासद व्हा

आजीवन सभासद शुल्क रु ५००/– + ५००/– (अंक निधी)
आपण सभासद असाल तर अजून एक तरी सभासद नोंदवा.

### सभासद कसे व्हाल ?

१) डी.डी/मनीऑर्डर, ''महाराष्ट्र पक्षीमित्र'' या नावे अमरावती. येथे देय असलेला असावा.

२) Core Bank System नेही पैसे पाठवू शकता.
बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र, गाडगे नगर, अमरावती.
खात्याने नाव : महाराष्ट्र पक्षीमित्र,
बँक खाते नं. : ६००३६८१२०१७
IFSC Code - MAHB0000639
खात्यात पैसे भरून त्वरीत मेलने कळविणे, तसेच सभासदाचा अर्ज भरून पोस्टाने पाठवणे अत्यावश्यक आहे. सोबत पे–इन स्लीपची झेरॉक्स जोडावी.

३) पत्रव्यवहाराचा पत्ता :– महाराष्ट्र पक्षीमित्र, द्वारा डॉ.गजानन वाघ अरण्यार्पण, ६३ समता कॉलनी, कठोरा रोड, अमरावती ४४४६०४

Email : pakshimitra@gmail.com
Website : www.pakshimitra.org

## त्रैमासिक अंक निधी

महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेचे मुखपत्र त्रैमासिक अंक पक्षीमित्र हा आपण दर तीन महिन्यांनी प्रकाशित करत असतो. या अंकाला छपाई व पोस्टेज मिळून वार्षिक ५५,०००/– ते ६०,०००/– रुपये खर्च येतो. संस्थेचे नियमित उत्पन्न काहीच नाही त्यामुळे हा अंक परवडत नाही, पक्षीमित्र संस्थेच्या व पक्षी संवर्धन संरक्षण कार्यात या अंकाची अत्यंत आवश्यकता आहे. याचसाठी हा अंक असाच चालू ठेवा असे वार्षिक सर्वसाधारण सभेत ठरवण्यात आले आहे. याच्या खर्चासाठी त्रैमासिक अंक निधी उभा करण्याचे ठरविण्यात आले आहे. आपण सुध्दा या अंकासाठी देणगी देऊन हातभार लावावा ही नम्र विनंती.

संस्थेच्या प्रकल्पाला आपण सुद्धा देणगी देऊन हातभार लावावा ही विनंती.

# महाराष्ट्र पक्षीमित्र

(संस्था रजि. नं. महा/२८५/९८/नागपूर)

## सभासद अर्ज

प्रति,

मा.अध्यक्ष,

महाराष्ट्र पक्षीमित्र

महोदय,

मला महाराष्ट्र पक्षीमित्र, नागपूर नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/२८५/९८/नागपूर या संस्थेचे नियम व उद्दिष्टे मान्य आहेत. मी शपथपूर्वक सांगतो की, मी सर्व नियमांचे कोटेकोरपणे पालन करीन. मी वरील संस्थेचा आजीवन सभासद होऊ इच्छितो. माझा व्यक्तिगत तपशील खालील प्रमाणे आहे.

संपूर्ण नाव : ____________________

संपूर्ण पत्ता : ____________________

____________________

फोन नं. ____________ मो. ____________

ई–मेल ____________________

जन्मतारीख : ____________________

शिक्षण : ____________________

नोकरी/व्यवसाय : ____________________

छंद : ____________________

माझी वर्गणी सोबत देत आहे (D.D./Money Order / Core Bank System)

कृपया माझी सभासद म्हणून स्वीकृती व्हावी ही नम्र विनंती.

श्री/श्रीमती यांनी सुचविल्यावरुन सभासदत्व घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| दिनांक | **अध्यक्ष** | आपला |
| **अर्ज मंजूर/नामंजूर** | **महाराष्ट्र पक्षीमित्र** | सही |

**महाराष्ट्र पक्षीमित्र ला देण्यात येणाऱ्या सर्व देणग्या 80 G अन्वये सवलत पात्र आहेत.**

## पक्ष्यातील अर्धनारीनटेश्वर



चित्रातील गुलाबी छातीचा ग्रॉसबिक उजव्या बाजूने नर डाव्या बाजूने मादी आहे. हा प्रकार दुर्मीळ आहे.

## श्रद्धांजली

पुणे येथील आपले एक सभासद श्रीनिवास पाध्ये यांचे दिनांक १९ ऑगस्ट २०२० रोजी दु:खद निधन झाले. ते पुस्तक व निसर्गप्रेमी होते. हिमालयीन डोंगरात फिरण्याचा त्यांचा विशेष छंद होता.

पक्षिमित्रतर्फे श्रीनिवास पाध्ये यांना श्रद्धांजली.

******

## लेखकांची सामान्य चूक

अनेक लेखक 'पक्षाचे, पक्षाला' असे लिहितात, हे 'पक्ष्याचे, पक्ष्याला' असे असावयास पाहिजे. पक्ष म्हणजे 'पार्टी' या अर्थी 'पक्षा'ला असा बरोबर असतो. तेच पक्षी म्हणजे 'बर्ड' याअर्थी वापरला असता त्याचे प्रत्यय पश्चातरूप पक्ष्याला, पक्ष्याने असे होते.

लेखक अशी सावधगिरी बाळगतील तर मजकुराची दुरुस्ती सोपी होईल.

**Book Post**

प्रती,


प्रेषक :
**महाराष्ट्र पक्षिमित्र**
६३, अरण्यार्पन समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*



**पक्षिमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : गौरी एंटरप्राइजेस, नाशिक
मुद्रक : ज्ञानपथ प्रिंटर्स अँन्ड ग्राफिक्स, अमरावती